ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : मुंग्यांचें वारूळ

लेखक : बाबुलनाथ

प्रकाशक : आर्यसंस्कृति प्रकाशन, पुणे

प्रकाशन वर्ष : १९४५

मूळ ग्रंथ प्रत : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रूपांतर - २०२१

# मुंग्यांचें वारूळ



बाबुलनाथ; पुणें

861

861
Bab
4209

D.V.POTDAR LIBRARY
S P COLLEGE
D00921

# मुंग्यांचें वारूळ

बाबुलनाथ

१९४५

आर्यसंस्कृति प्रकाशन, पुणें

किंमत दोन रुपये

म।६९५७

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन ]

मुद्रक व प्रकाशक— लक्ष्मण नारायण चापेकर, आर्यसंस्कृति मुद्रणालय,
१९८/१७ सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणें शहर.



कै० शामराव गणेश काळे

तीर्थरूप

कै० शामराव गणेश काळे,

पोस्टल इन्स्पेक्टर, सातारा डिव्हिजन,

सातारा

यांच्या पवित्र चरणीं

सादर समर्पण.

—बाबुलनाथ.

'शामसदन'

६० सोमवार पेठ,

पुणें शहर.

रामनवमी, शक १८६७.

## कवितागायन

[ बालमुकुन्द ]

मम कवन कुणा हें गाऊं रसिकाविना ?
क्षण कुणी जरी, श्रवुनि घे तरी, प्रसन्नता ये मना !

मज कवी न कोणी म्हणती कांहीं खरा
वा शाहिर नमुनी गोंधळ करितो पुरा
कीं बेसुर कोणी म्हणती गातो जरा
ह्या अपशब्दांनीं घडति जिवा यातना !

करि 'गिल्ला' कोणी पडावया मी फशीं
क्षणभरांत त्यांची मर्जी जाते कशी ?
अन् त्यांत कोठुनी मिळतां 'अंडीं, भजीं'
करि जखमेवरती प्रताप अपुला चुना !

गंधर्वकवींचें गान तुम्ही ऐकतां
वा श्वान भुंकतां मुकाटही सोसतां
मग तुम्हीच माझें ऐका गाणें अतां
'हो दगड देव तो' तुमच्यावांचुनि कुणा ?

( आकाशगंगा )


## कांहीं म्हणा पण —

[ मंजरी ]

मज 'भ्याड' कुणीही रसिकांनीं बोलले
वा 'चोर' नांव हें बळें जरी लादलें
'वेड्यां'त काढिलें किंवा मजला कुणीं
साहीन सर्व तें वदाल तोंडांतुनी !

पण कृपा करूनी 'कवी' म्हणा ना मला
हरसाल 'शिवी' त्याविना कुठें आजला ?

( जलधारा )



अरे ! आला कवि !

4209
861 Beeb
तारीख 4-3-93

# टेरेन्स् मॅक्स्विनी

निस्सीम ज्यांची खरी देशभक्ती असे वीर जे ह्या जगीं जाहले
डोळ्यांपुढें येउनी मूर्त तूझी समाधान वाटे मना चांगलें !
होती तुझी मायभू पारतंत्र्यीं तिचीं बंधनें तीक्ष्ण तोडावया
बाल्यामधें प्रेरणा तूज झाली अलौकीक संदेश लाभूनिया !

'स्वातंत्र्य-संगीत' तूं गाइलें त्या क्षणीं दुस्सहा फार देशस्थिती
केलींस तूं नाटकें दिव्य त्यांनीं जनांच्या हृदीं जाहली जागृती !
संपूर्ण स्वायत्तता पाहिजे हा तुवां घेतला मंत्र रात्रंदिन
स्वातंत्र्य लाभेल देशास केव्हां मनीं राहिलें शल्य हें टोंचुन !

चैतन्य निर्माण केलेंस लोकीं तयांचा पुढारी खरा शोभुनी
तूं काढिलें पत्र त्यांतील तत्त्वें जनांच्या हृदीं राहिलीं कोरुनी !
गर्दी तुझ्याभोंवतीं सैनिकांची स्वयंस्फूर्तिनें खास सामावली
तुझी प्रेरणा लाभुनी राष्ट्रभक्ती तयांच्या हृदीं नित्य फोफावली !

'प्रत्येक तें राष्ट्र राही चिरायू तयाला कधींही न मृत्यू असे
साम्राज्य आहे परंतू क्षणाचें कळेना कधीं नष्ट तें व्हायचें'!
हें तत्त्व तूझें झणीं सैनिकांच्या पुरेपूर अंगामधें बाणलें
प्राणाहुती द्यावयाला स्वतःची तुझ्यासंगतीं ते खडे राहिले !

एकाकिं तेव्हां महायुद्ध आलें तुला वाटुनी तेधवां पर्वणी
देशामधें बंड तूं माजवूनी खरा जाहला वीर लोकाग्रणी !
लोकांमधें हाय ! माजून बेकी गुन्हेगार तेव्हां तुला घेरलें
झाली तुला कैद नी हद्दपारी तरी धैर्य नाहीं तुझें लोपलें !

निष्ठा, धडाडी तुझी बाणलेली कमी ती न होतां पुरी वाढली
आला तुला आत्मविश्वास मोठा विमुक्ता कराया तुझी माउली !
अध्यक्षस्थानीं* तुझा मित्र त्याचा जरी खून जाणून केला कुणीं
कर्तव्य मानूनियां त्याच जागीं उडी घेतली तूंच निःशंकुनी !

डोक्यावरी तूझिया खड्ग तेव्हां जरी नागवें शत्रुनें टांगलें
संहारण्या दुर्दशा मायभूची तुवां प्राण होमामधें अर्पिलें !
आरोप तूझ्यावरी लादुनीयां अरेरे ! पुन्हा कैद ती जाहली
जातां सख्या ! तूंच कारागृहाला तुझी मायभू फार खंतावली !

कारागृहीं राहुनी तूं उपाशी तिथें दाविलें दिव्य लोकोत्तर
मृत्यू स्वतः घेतला ओढवूनी पुरी मात केलीस शत्रूवर !
झाली तुझी आत्मशुद्धी अखेरीं तुझ्या स्वार्थत्यागास नाहीं तुला
तूं आणखी मायभू धन्य तूझी ! जगानें तुला मान मोठा दिला !

(* आयर्लंडमधील कॉर्क शहरचा नगराध्यक्ष –टॉमस् कर्टिन)

---

## त्याची भूक !

"बायको असूनी जिवंत पहिली खरी
आणिली कशाला करून दुसरी तरी ?"
हा प्रश्न टाकतां टिचून् वदे लेखक–
"शमविण्यास माझी भूक अहा बौद्धिक" !

नच कोडें सुटलें– 'भूक काय बौद्धिक'
जग समजे त्याची भूक मात्र लैंगिक !!

---

## बाथरूम–सिंगर !

बैसुनी स्नानगृहीं ह्या कोण गाते सुंदरी
गान तीचें ऐकतांना मोहिनी वाटे खरी !

गोड गाण्याची लकेरी लाजवीते कोकिला
अप्सरा स्वर्गांतुनी ये दाखवाया चातुरी !

का कलावंतीण कोणी गोड ताना मारते
निर्झराचें संथ पाणी गातसे तालावरी !

गुंजते कुंजांत किंवा भृंगराणी एकटी
आपुल्याशीं गान गाते कीं किशोरी लाजरी ?

गोड गाणें दिव्य भासे जीव हा वेडावला
गायिका ती पाहण्याला ध्यास लागे अंतरीं !

दार झालें मोकळें जों (घात मोठा जाहला !)
हाय ! मोलारीण येई घासुनी भांडीं परी !

रूक्ष तीच्या दर्शनानें मी जरी ओशाळलों
हो सिनेवृत्ती मनाची तेधवां जागी पुरी !

पार्श्वसंगीतें म्हणाया ही जरी कामास ये
वेड ही लावील लोकां ना नटी झाली तरी !

---

## माहेरीं गेलीस पण—

विवाह अपुला सखे ! नच अतां कुठें जाहला
पुढें अधिक मास तो चुकुनियां कसा पातला ?
तुला न मम पाहणें मुख म्हणून त्या संधिला
मला त्यजुनि एकला परत जाशि माहेरला ?

सखे ! तुजसि जाउनी दिवस चार ना जाहले
प्रचंड विरहाग्निनें हृदय पोळुनी टाकलें !
समग्रसदनामधें वसत मी पिशाचासम
कळे न मज चालला मम कसाचि नित्यक्रम !

जडत्व शरिराप्रती न कळतां कसें येउनी
प्रशान्त मज झोंप ती कधिं न राहते लागुनी !
तुझ्या मृदुल हातचा मधुर लोपतां तो चहा
मला प्रथम रोज ती गमत आपदा दुस्सहा !

कितीक जरि भोजनें 'वसातिच्या गृहीं' झोडलीं
न तीं रुचिर भासुनी उलट ये शिसारी गळीं
सखे सुगरिणी ! तुझ्या हातुन ऊन ताजीं भजीं
कधीं ग मिळणार तीं अहह ! लागली काळजी ! !

अलोट कचरा पहा चहुंकडे गृहीं सांठला
तुझी खरंच 'लक्ष्मी' बघत वाट हा थांबला !
मलूल दिसती कशा विसकटून साऱ्या चिजा
त्वदीयविरहें जणूं गमत पोंचल्या त्यां इजा !

न काम कसलें मला सुचुनि वृत्ति हो चंचल
हृदीं विरहवह्नि हा धुमसुनी करी व्याकुल !
सुरम्य प्रतिमा तुझी बघत वेळ काढूं किती
अतृप्त मम वासना पुरवशील वेडे कधीं ?

कसातरि कुठें वृथा भ्रमुनि लोटतां ये दिन
छळे पण निशा युगासमचि भासुनी वैरिण !
हृदीं प्रणयसिंधु हा उफळुनी न राही स्थिर
प्रफुल्ल मुखचंद्रमा तव दिसेल का सत्वर ?

---

## 'लाल' बावटेवाले !

'लाल बावटा' रस्त्यामध्यें दिसे फडकलेला
हळू हळू त्याभंवतीं दिसला लोकांचा मेळा !
'कम्यूनिस्ट' ते सारे भाई होउन बेभान
क्रांतीवरती देतिल आतां जहाल व्याख्यान !

विचार केला भाषण त्यांचें ऐकाया जावें
पटले नाहीं विचार तर तें सोडुनियां द्यावे !

आतुरतेनें म्हणून गेलों तेथें मी जेव्हां
हाय ! निराळें दिसून आलें दृश्य मला तेव्हां !

कम्यूनिस्ट' ते क्रांतीकारक व्याख्याते कसले ?
साफसूफ 'ड्रेनेज' कराया कामकरी जमले !

'डेंजर सिग्नल' लाल बावटा त्यांचा तो बघुनी,
दुर्गंधीचा वास आणखी लावी मज पळुनी !!

---

# केळीचें झाड आणि मी !

वृक्ष आवडतो आम्र कोकिलांना
झाड पेरूचें तसें पोपटांना
प्यार चिंचेचें झाड बालकांतें
मला केळीचें झाड आवडे तें !

पान हिरवें हें किती स्वच्छ मोठें
भोजनाला सर्वांस गोड वाटे !
पान इतुकें नच लांब तें कशाचें
नवल नाहीं का हेंच निसर्गाचें ?

फूल केळीचें भोंवऱ्यासमान
दिसे नाजुक तें बालपणीं छान !
वाढ त्याची जसजशी रोज होते
पहा भाजीच्या कारणास येतें !

समारंभाला, सणाला कधींही
मधुर केळीं खातांच मौज येई !
सत्यदेवाच्या प्रसादांत ह्यांना
स्थान लाभुनि पद मिळे जें न कोणा !

रोज केळीं खाऊन तीं खुशाल
बळें टाकी रस्त्यांत कुणी साल !
साल सांगे लोकांस 'नीट चाला,
सज्ज व्हावें ना तरी शासनाला' !

लग्न मुंजी असतात ज्या घरांत
खुंट केळीचे दारिं बांधतात !
दोन बाजुंस हे गरुड-हानुमंत
करिति स्वागत जोडून काय हात ?

गौर रमणींचे पाय वर्णितांना
खुंट केळीचे गमति ते कवींना !
आणि रमणी ठेंचून तेच खुंट
पापडांस्तव जल खूप काढतात !

किती केळीचें झाड येत कामीं
व्यर्थ माणुस ह्या जगीं जन्मलों मी !
जगुन नाहीं उपयोग कुणासाठीं
आणि मरुनी होणार मात्र माती ! !

---

## तिचा मंगळ !

ही नाजुक, सुंदर बाला माझी किती
मॅट्रीक पास ती पहिल्या वर्गांमधीं !
गाण्याची तिजला अवगत आहे कला
सकलांस तिचा सुस्वभाव लावी लळा !

पत्रिकेंत आहे तिच्या परी मंगळ
उजवितां तिला मम सूड पुरा घेइल !

---

## भविष्य माझें सांगायाला—

भविष्य माझें सांगायाला जोशी कुणि भेटला
कुडमुडा जोशी कुणि भेटला !

"हें दैव शिकंदर तुमचें सर्वांहुन
येतील लौकरी सोन्याचे ते दिन,
होईल मुलाचा लाभ बरें त्यांतुन !
नोकरींत ती होउन बढती मिळेल पैसा भला !"
—असें तो जोशी मज बोलला !

हासलों मनाशीं त्याचें वच ऐकुनी
अन् शान्तपणानें वदलों त्यालागुनी—
"समजलास जोशी ! काय मला रे मनीं ?
पोटासाठीं बकबक वेड्या ! चालविली जरि किती
व्हायची निष्फळ ती शेवटीं !

मी भाग्यवान तो प्राणी नाहीं बरें,
बेकार होउनी रस्तोरस्तीं फिरें,
मज पोटासाठीं मिळत न कांहीं पुरें !
प्लेगामध्यें नुकती गेली प्रिया मला सोडुनी
व्हायचा मुलगा मग कोठुनी ?"

हें उत्तर माझें सडेतोड ऐकुन
तत्काळ मनीं तो सर्द पुरा होउन
अन् तोंडामध्यें घे अपुल्या मारुन
"क्षमा करा मज"— बोलुनि कोठें दृष्टिआड जाहला
गमे त्या—"ठकास ठक भेटला !"

—

# क्लबाकडील गोष्टी

[उनाडटप्पू लोकांचा हा 'नाट्यक्लब' सध्या मोडकळीस आल्याकारणानें त्याचें पुनर्जीवन केव्हां होईल हें सांगणें कठीण आहे ! केशवसुत ! तुम्ही मात्र क्षमा करा !]

गोष्टी क्लबाकडिल मी वदतां गड्या रे
हासूं नकोस पण ऐकुन घेइं सारें !
वस्तू तुला सकल ज्या दिसतील तेथें
व्यक्तीपरी असति भूषण त्या क्लबातें !

हीं देख पेठ 'बुधवार' पुण्यामधील
'गर्दी अहर्निश जिथें असते कमाल !
भांग्या' विदीत 'बजरंग' अहा तिथून
प्रख्यात बोळ दिसतो चल त्यामधून !

गल्लीमधून शिरतां वर डुंकशील
मोठा उजेड तुज रात्रिस तो दिसेल !
मित्रा ! हळूच जपुनी पद टाक तूं रे
मौजा पहा न कळतां रमणींचिया रे !

आवाज 'किर्र' रजनी जरि बोलताहे
'शुक् शुक्' असा ध्वनि इथें पण चालताहे !
माडीवरी बघ कुठें नव रंगढंग
गाण्यास त्यांतुनि चढे भलताच रंग !

ह्या सातआठ त्यजुनी पहिल्या घरांतें
माडीवरी 'क्लब' पुढें चल आंत ते थें
माडीस ह्या बघ जिना झुलता, अरुंद
कीं चालतां करकरां करतो निनाद !

खोलीस दार बघ हें बुटकें, पुराणें
वाकून आंत हलके जपुनीच येणें !
खोलीमधें जरि दिवा जळतो विजेचा
वाऱ्याविना गुदमरे जिव माणसाचा !

मित्रा ! चहूंकडुन विस्कटली पथारी
ताटांतली 'उडुनि' पान तशी सुपारी !
पाऊस येथ पडला जळक्या विड्यांचा
भिंतीस रंग चढला बघ लाल कैसा !

वाद्यें मुकीं सकल तीं दिसती पडून
पेट्या तशा पसरल्या कपडे कुजून !
तालीम चालुन इथें नव नाटकाची
'पात्रें' दमून निजलीं सगळीं क्लबाचीं !

निद्रिस्त घोरत पडे बघ जो विशाल
वेडा, विदूषक तया म्हणती टवाळ !
त्या मास्तरां कढुन मी प्रिय शिष्य शोभें ?
लोकांत तो जरि म्हणे मज शिष्य लाभे !

ह्या मास्तरांस बघुनी मज कींव येते
आहे चलाख पण कांहिं न चीज होतें !
नाट्यें तशा पटकथा लिहितो सदैव
पैसा न कीर्ति पण देइ तयास दैव !

त्या मास्तरापलिकडे बघ लोळणारा
गोटया ! लहान मम बंधु सतेज 'तारा' !
तो नृत्य-गान शिकुनीच तयार होतां
त्याच्यामुळें मजसि लाभ मिळेल मोठा !

गोट्या ! गड्या ! नट खरा बनशील काय ?
तूं रंगभूमिवरती तगशील काय ?
गोट्या ! जनांस तव गान रुचेल काय ?
'गंधर्व' नांव तुज सांग मिळेल काय ?

चोरापरी हळुच टाकित पाय पाय
मित्रा ! बघूं पलिकडे दिसतेंच काय ?
खोलीस ह्या पण दुज्या न दिसे प्रवेश
आंतील तें मग कळेल कसें विशेष ?

दाराचिया बघ फटींतुन हात जातो
आंतील काढुनि कडी हलकेंच घेतो !
ये ये पुढें भिउं नको अगदींच मित्रा
चावेल ना जरि दिसे तुज येथ कुत्रा !

मित्रा ! अचानक इथें मज ये शिसारी
येथें हवा नसुन वास भरे विकारी !
दुर्गंध नाहिं कधि 'नागझरी'स ऐसा
वाटेवरी 'मटन-मार्किट'च्या न तैसा !

मित्रा ! असा हळुच डाविकडून येईं
खोली इथें बघ प्रशस्त न त्याहुनी ही !
'पात्रें' स्त्रिया अहह ! या स्थलिं झोंपतांना—
पाहून, हाय ! कणवा नच येइ कोणा ?

तो मोडका बघ पलंग तिथें निजली
'खड्कीकरीण बिजली' दिसण्यांत काळी !
कन्या तिची जवळ ती अगदींच तैशी
लाभे क्लबास बघ 'माल' असा स्वदेशी !

निद्रिस्त येथ दुसऱ्या बघ ह्या मुली तूं
कीं 'भावबंधन'मधीलच इन्दु-बिन्दू !
ती कोण दूर रडते ?-निजली असूनी-
अश्रू कशास्तव तिच्या नयनीं गळूनी ?

भावी असे मम वधू बघ तीच नामी
(गोव्याहुनी तिजसि जाउनि आणिली मीं !)
'वेडे ! उगी; रडुं नको ! पुरवीन कोड
स्वर्गीय सौख्य तुज देइन गोड गोड' !

मागील दार बघ हें इथुनीच जाऊं
'हॉटेल' तें जवळ 'गोल्डन टी'च घेऊं !
तेथें गड्या, 'त्रिल' हवें तुज द्यावयाला
जाऊं तुझ्या मग घरीं—लकडी पुलाला !!

---

## दत्तक !

मीं कशास देवा ! दत्तक हा घेतला
सज्ञान कुठें जों आतां नच जाहला
भांडून भयंकर संपत्ती मागतो
मी मरतों केव्हां वाट सदा पाहतो !

मज वृद्धपणीं हा छळतो बेटा असा
मग मेल्यावरती पाजिल पाणी कसा ?

---

## पुराणिकबुवा !

मंदिर गांठुन चौरंगावर पुराण हा सांगतो
रोज रोज मग थवा स्त्रियांचा हळूहळू वाढतो !

स्कंध महाभारतामधिल ते संस्कृतांत वाचतो
स्पष्टपणें प्राकृतांत त्यांवर टीकामृत पाजतो !

निवेदतांना प्रणयरसाच्या कथा स्वता रंगतो
पिकल्या पानामधील हिरवा रंग जणूं दावितो !

मधेंच येतां मात्र खोकला चष्मा संभाळतो
नवीन सुंदर 'पात्रें' दिसतां अचूक त्यां हेरतो !

आजीबाईजवळ तियेची तपकिर हा ओढतो
शिंक देउनी निद्रित बाया ताळ्यावर आणतो !

कोरड पडतां कधीं घशाला खडिसाखर सेवितो
तांदुळ जमले कितीक पुढती बगळ्यासम पाहतो !

दिवस संपतां करुनि समाप्ती पोथी गुंडाळतो
अल्प बिदागी दिसतां पुढती मनांत संतापतो !

समजुन 'चोराची ती लुंगी' खांकेला मारतो
'शिधापद्धति'स शाप देउनी घराकडे चालतो !

घरास जातां शालजोडितुन अहेर कुणि अर्पितो—
"पुराणांतलीं वांगीं आम्ही पुराणांत ठेवितों" ! !

---

## सैंपाकीण नव्हे—

## मालकीण !

दुर्दैवाचा हाय ! अचानक घाला मजवर आला
कृतान्त काळानें मजपासुन नेलें प्राणसखीला !

पोरें माझीं उघडीं पडलीं कोण तयां मायेचें
कोडें पडलें लालनपालन त्यांचें करणें कैसें ?

'आई ! आई !' म्हणून संतत अकान्त पोरें करती
रोदन त्यांचें कानीं पडतां तुटुनि आंतडीं जाती !

'रक्षण पोरांचें करण्याला आणि सैंपाकाला
मिळेल एखादी का बाई' ? विचार मजला पडला !

वर्तमानपत्रांत अखेरी जाहिरात मीं केली
नशिबानें त्या वेळीं माझी फसगत नाहीं झाली !

अहा ! लाभली सत्वर सुंदर गरीब विधवा बाई
स्वभाव आणिक गोड तिचा तो दिसून मजला येई !

ळळा लागला तिचा मुलांना, तैसा तिजला त्यांचा
सुरळित गाडा चालू झाला पुनश्च संसाराचा !

निज मातेची हळू हळू मग मुलांस विस्मृति झाली
नकळत बाई नवीन त्यांना माता अपुली गमली !

चुकून त्यांनीं तिजला 'आई' हांक अशी मारियली
हांक मात्र ती मम हृदयाला चरचर कापत गेली !

बनली 'आई' ही जर त्यांची (मनांत ये मग शंका
आज उद्यां वा खरोखरी मम होइल पत्नी ही का ?)

चमत्कार अन् घडून आला थोड्या दिवसांमध्यें
ती चंद्रा, मी सागर बनतां प्रीतिस आलें भरतें !

मनास मन तें जुळलें आणिक मंगल अमुचें घडलें
व्हायाचें तें होऊन गेलें ! किती जरीही चुकलें !

'सैंपाकिण मालकीण बनली !' जिकडे तिकडे झालें
'किर्लोस्कर' मासिकीं तिचें अन् चरित्र छापुन आलें ! !

---

## नटीच्या नवऱ्याचें गाऱ्हाणें

लग्न नटीशीं लावियलें मीं हाय बरें कुठुनी
पश्चात्तापानें मन माझें जातें जळफळुनी !

वरच्या नकली सौंदर्याला भुलला मम जीव
आधीं कळला नव्हता तिचिया हृदयाचा ठाव !

माझ्या श्रीमंतीवर चाले रोज तिचा थाट
पैसे मिळती जे तिजला ती टाकी शिलकेंत !

'स्टुडियों'त ती सर्व दिवसभर कामाला जाते
संध्याकाळीं मोटर घेउनि दूर कुठें फिरते !

दिवेलागणीं हो मज तैशी लागे हुरहूर
'अजून येती घरीं न कैशा राणी सरकार' ?

कधीं कधीं तर घरास येते रात्रीं अपरात्रीं
रागानें तिज बोलायाची त्यांत मला चोरी !

झोंप लागलेली मज बघुनी जवळ न ती येते
कुशीस अपुल्या घेउन निजते कुत्रें आवडतें !

आठवड्यांतुन ज्या ज्या दिवशीं सुट्टी तिज मिळते
भेटाया तिज अलोट गर्दी फुकटयांची जमते !

'खास मुलाखत' छापाया कुणि संपादक येतो
फोटोग्राफर फोटो घ्याया उगाच धडपडतो !

करारनामा करावयाला मालक नव येती
जलसा गाण्याचा ठरवूनी हौसी जन जाती !

विमा कंपनीचाही येतो दलाल धांवूनी
नवीन साबण देऊन घेई अभिप्राय कोणी !

दिग्दर्शक अन् त्यांतुन येतां घेउन मोटार
फिरावयाला घेउन 'मैना' जातो बाहेर !

उघड्या डोळ्यांनीं मी बघतों तिचे असे खेळ
सहवासाचा लाभ तिच्या मज नाहीं क्षणकाल !

अनेक अफवा तिजविषयीं जन देती पसरून
रोज रोज त्या ऐकुन जातों मनांत करपून !

भोळाशंकर मी ती गंगा डोक्यावर बसली
स्वातंत्र्याचे हक्क हिरावुन डोईजड बनली !

ताटाखालीं तिनें बनविलें मजला मार्जार
बिनशर्तीची तिच्यापुढें मी घेतों माघार !

नीरस माझें जीवन असलें कसला पुरुषार्थ ?
लग्न नटीशीं लावियलें मीं ह्या जगतीं व्यर्थ !

घटस्फोट ती घेउन माझा जाऊं दे देवा !
मिळेल माझ्या मनास शान्ती कायमची तेव्हां ! !

---

# हाय ! हाय ! तो भाला !!

(एक दणदणीत, झणझणीत आणि ठणठणीत विलापिका !)

**भालाकार ! क्षमा करा !!**

हाय ! हाय ! तो लोपुनि गेला आज कसा भाला
सनातनी मतपत्र तयावर कसला ये घाला ?

बंद कशानें एकाएकीं पडलें तें पत्र
जन्माच्या का वेळीं नव्हतें मंगल नक्षत्र ?

सनातन्यांची बाजू आतां कशांत येईल
राजकारणामधें कोण तो गुलाल उधळील ?

जुनीपुराणी सारी अपुली शिकवण तेजस्वी–
देइल आतां कोण लिहूनी भाषा ओजस्वी ?

नवशब्दांची टांकसाळ ती कोठें दिसणार ?
भाला मोडुनि स्वस्थ बैसले जर भालाकार !

ब्राह्मण्याचा कोण अतां तो धरील अभिमान
वर्णसंकरावरी चिडुनि अन् होइल बेभान !

सुधारकांना कोण भयंकर धक्का देईल
सनातनी धर्माचें अपुल्या स्तोम माजवील ?

सहभोजन जे करती त्यांना टाकुनि वाळींत
भ्रष्टाकाराबद्दल येइल कुणा बरें चीड ?

'रोटीबंदी', 'बेटीबंदी' करावया पार
कोण जिवाची शिकस्त करुनी आतां लढणार ?

अस्पृश्यांना मंदिरांत ती दर्शनास बंदी–
करावयाला धांव कोण हो घेइल यापुढती !

'पंचगव्य' प्राशून श्रावणी ती करण्याकरतां
कोण विनंती ब्रह्मजनांना करील हो आतां ?

'अंडीं सोडुनि भेंडी' खावी तरुणांनीं सकल
लबलबीत अन् कोण शिऱ्याचें महत्त्व सांगेल ?

'द्रोणाबद्दल वाट्या' असती सुलभ भोजनाला
पटवुन देइल कोण अतां हें मानवजातीला ?

आणि स्त्रियांना पोरें झालीं एकाहुनि फार
'बाबागाडी' वापरण्याला कोण सांगणार ?

'लाठिबंद' होण्यास कोण तो देइल संदेश
'बोलूकाका' मुळीं न होणें मिळेल उपदेश ?

'धर्मकारणासाठीं आधीं सोसावें मरण
राजकारणीं मग चमकावें'—वदेल हें कोण ?

'मी टिळकांचा घट्ट, पट्ट नी मट्ठ असें शिष्य'
दिसावयाचें पत्रामध्यें कुठल्या हें दृष्य ?

सल्ला देइल कोण तुम्हांला कौन्सिलांत जावें
मिळेल तें तें पदरीं घ्यावें आणिक भांडावें ?

कौन्सिलमध्यें 'घुसा आणखी घांसा' हा मंत्र
कोठुनि सांगा दिसावयाचा आतां इतरत्र ?

असहकारिता झूट आणखी झूट अहिंसा ती
स्पष्टपणें लिहिणार कोण तें पत्रांतुन अगदीं ?

गांधीजींना जरी 'महात्मा' जग दे ठरवून
'मोहात्मा' तो खास कोण हें वदेल गर्जून ?

परदेशी तो खजूर खाती गांधी बेताल
त्यांच्या नादीं लागुं नये हें कोण निवेदील ?

टिळकांनंतर नसे पुढारी भारतदेशाला
छातिठोक हें गर्जुन गेला काय बरें भाला ?

टिळकांनंतर त्यांचे चेले नेते हे कसले ?
'तात्या' देती फिरवुन पगडी भाल्यानें कथिलें !

'भाव्यां'नीं सहभोजन केलें त्या कोल्हापुरला
घ्यावें 'प्रायश्चित्त' तयांनीं भाला ओरडला !

'गोमाता ही माता नाहीं' वदला जो 'वीर'
छातींत त्याच्या जाउन बसला भाल्याचा वार !

'अनुलोमात्मक विवाह' केला ज्या वेड्या कविनें
फटके मारुनि धिंड काढली त्याची भाल्यानें !

'लखुअण्णा'च्या निवडणुकीला भाला ये आड
बुरख्यांतिल अन् 'अलमगिरा'ला वदला तो भ्याड !

निजशौर्यानें चमकुनि गेला खरोखरी भाला
दर्शन त्याचें होणें नाहीं आतां कोणाला !

वर्तमानपत्रांत मिळवुनी दिगंत ती कीर्ती
सनातन्यांचा भाला पडला का धारातीर्थी ?

भाल्यासाठीं सनातनी ते सारे हळहळती
मुखपत्राविण कोण तयांची गाइल ती महती !

सनातन्यांनो ! आवरता घ्या तो अपुला शोक
भाल्याचें तें पुढें करावें कार्य रोखठोक !

'बरची' किंवा 'विचवा' आतां हातीं घ्या कोणी
चित्र तयाचें रंगविण्याला तयार हा प्राणी !!

---

## माझें नाटक !

(एका उदयोन्मुख नाटककाराची (!) ही एक 'रडकथा' आहे. कोणास ती 'सत्यकथा' अगर 'माकडकथा' वाटल्यास कवीचें त्यांत थोडेंच बिघडणार आहे ?)

हें जिवंत नाटक मम असुनी
कां रंगभूमिवर घे न कुणी ?

स्फूर्ति भयंकर येतां दाटुन
कचेरिलाही बुट्टी देउन
अनेक रात्री जागुन जागुन
मीं नाटक लिहिलें धडपडुनी !

पूर्ण कसेंतरि नाटक झालें
काम हातांतिल संपुनि गेलें
कोडें पण मजपुढती पडलें
करणार कोण हें रंगवुनी ?

लेखक त्यांतुनि मी नवखा तो
आंग्लकथा अनुवादित करतों
कणिकासम लघुकाव्यें स्फुरतों
अन् नाटककार अतां बनुनी !

जीवन माझें कारकुनाचें
समाधान मज नाहिं कशाचें
गमतें नाटक देईल पैसे
जाईल दैन्य मग ओसरुनी !

कंपनीस हें कुठल्या देऊं
कुणा-कुणाला वाचुनि दावूं

अचूक वशिला कोठें लावूं
मन गेलें माझें गोंधळुनी !

'मिळेल बक्षिस नाटक धाडा'
जाहिरात ती पत्रीं दिसतां
नाटक तेथें धाडुनि देतां
ये प्रसंग भलता ओढवुनी !

पुरती जिरली ! बक्षिस कसलें ?
गहाळ तेथें नाटक झालें
कसेंबसें तें परत मिळालें
दप्तरीं अतां आहे पडुनी ! !

---

## दोन बायकांचा खाजगी संवाद

मैत्रीण:—

"भेटलीस बाई ! किती दिसांनीं मजला
अन् दिलें न अपुलें गुपित कळूं कोणाला
राहुनी 'गरोदर' महिना कितवा आतां
देणार कधीं तूं बर्फी किंवा पेढा ?"

ती:—

"चल् चावट कुठली तुला न कांहीं कळतें
नच विचार करतां भलतें मज कां पुसते ?
मी नसुनि 'गरोदर' पोट पुढें जें आलें—
जाहला 'जलोदर !' डॉक्टरनीं सांगितलें ! ! "

---

## लोकप्रिय अण्णा गेले !

[**अण्णांची ओळख:—** अण्णा हे एका ऑफिसांत मोठ्या हुद्यावर होते. त्यांचा स्वभाव विनोदी आणि प्रेमळ होता. सर्वांशीं मिळूनमिसळून ते वागत त्यामुळें ते अतिशय लोकप्रिय झाले होते. त्यांच्या अकालीं निधनामुळें सदरहू विलापिका स्फुरण पावली आहे !]

हें काय अकल्पित झालें लोकप्रिय अण्णा गेले !
वार्ता ती दुःखद भारी घडकून कचेरींत येई
सगळयांच्या कानीं पडतां मनिं जो तो थिजुनी जाई
दुःखाची भीषण छाया सर्वत्र पसरुनी राही
दैवाचा दारुण घाला
आजलः अचानक आला
हिरमोड सुखाचा झाला
जें होऊं नये तें घडलें लोकप्रिय अण्णा गेले !

अण्णांची सोज्ज्वल मूर्ती नच जाते डोळयांपुढुनी
सुस्वभाव प्रेमळ भारी बंधुभाव दे वाढवुनी
अधिकार असूनी हातीं गाजविला व्यर्थ न त्यांनीं !
खेळाडू ठेवुनि वृत्ती
कारकून जे जे हातीं
मिसळून तयांतुन अगदीं
लौकिकास मोठ्या चढले लोकप्रिय अण्णा गेले !

चालतां काम तें आतां बोलेल विनोदी कोण ?
देउनियां टोपणनांवें हांका त्या मारिल कोण ?
'केसरी-मराठा-माला' दावील बरें वाचून ?

शेंगा त्या ओंजळ भरुनी
चाकूनें पेरू चिरुनी
देईल न तैसें कोणी—
फुकटचे चहाचे पेले ! लोकप्रिय अण्णा गेले !

भरणार नाहिं यापुढती संमेलन कारकुनांचें
जिलबींचें जेवण तैसें 'अण्णा'विण नच व्हायाचें !
बाईचें त्यांतुनि गाणें थांबलेंच तें कायमचें !
सफरी त्या सिंहगडाच्या
फेऱ्या नि चतु:शृंगीच्या
निघणार अतां हो कैशा
जर कुणी पुढारी नुरले लोकप्रिय अण्णा गेले !

अण्णांच्या राजवटीचा संपला गोड इतिहास
आतां न येउं दे कोणी उशिरानें ऑफीसास !
सवलती सुखाच्या सगळ्या हाय ! हाय ! पडल्या ओस !
अण्णांचें राज्य निमालें
त्या जागिं कुणी जे बसले
'महाराज जंगली' गमले
पारतंत्र्य नशिबीं आलें लोकप्रिय अण्णा गेले !!

———

के. ब. म. २३ ... पोलवाप
ग्रंथ संग्रह

## बारी !

चाळींत—

जिकडे तिकडे आज खरी　　लागुन गेली ही बारी !
महायुद्ध हें येऊन　　गेला जिव हा कावून
पुणेंसारख्या शहरांत　　रोज नवे जन येतात
देहू आणि खडकीला　　जो तो लागे कामाला
जागा नाहीं कोणाला　　मिळे कुठें राहायाला
एकच जागा घेउन ती　　अनेक जण करती वसती
हाल भयंकर सोशीत　　लोक नांदती चाळींत
सूर्योदय जों ना होतो　　धडपडुनी जो तो उठतो
बहिर्दिशेला जाण्याला　　आतुर जन सारा झाला
हाय ! दिसे त्या तिथें परी　　लागुन गेलेली बारी !

सलूनमध्यें—

आज असे तो रविवार　　सुट्टी-दिन सकलां प्यार
केस वाढले डोक्याचे　　ठरतां कापुन घेण्याचे
सलूनमध्यें जाण्याला　　तयार कोणी जर झाला
गर्दी तेथें त्यां दिसते　　कांहीं न वदतां पण येतें
येइल हातीं 'पत्र' तिथें　　वाचत तें बसणें नुसतें
आढळला वा मित्र जरी　　गोष्टी करणें कांहिंतरी
नंबर जेव्हां लागेल　　'कारागिर' अन् खुणवील
जाउन बसणें 'खुर्चि'वरी　　कारण तेथेंही बारी !

दुकानांत—

सुरू लढाई ती होई　　ये नशिबाला महागाई
मिळेल जैसें तें खाणें　　कसेंतरी जीवन जगणें
भाव वाढले भयंकर　　त्यांतुनि काळा बाजार
शिधापद्धती सरकारी　　अखेर ती झाली जारी

साखर आणिक रॉकेल — जिन्नस जेथें असतील
घ्याया जन दाटी करती — सोडुन अपुलीं कामें तीं
ऊन दुपारीं साहून — तिष्ठत आणिक राहून
मिळेल तें घेती पदरीं — जेव्हां ये अपुली बारी !

बस् स्टॅन्डवर—

उठुनि सकाळीं जों बघतां — आठ वाजती पहा तदा
एक तास त्यांतुनि गेली — पुढें घड्याळें तीं सगळीं
वाजुनि जाती दहा कधीं — कळून ये ना तें अगदीं
धांदल होई लोकांची — कचेरिला ती जाण्याची
जाउनि 'बस्' नाक्यावरती — राहि उभा जो तो आधीं
तिथें परंतू भटक्यांची — रांग लागली केव्हांची
मुलें बायकाही त्यांत — गोंधळ करुनी घुसतात
उशीर ऑफीसास करी — कारण 'बस्'लाही बारी !

बँकेंत—

तारिख पहिलीला फार — बँकेमध्यें व्यवहार
पगार नुकता झालेला — जो तो हर्षित झालेला
व्याजास्तव जो तो मरतो — पैशानें पैसा मिळतो
पैसे ठेवायासाठीं — लोकांची होते दाटी
पेन्शन घेणारे त्यांत — काठी टेकित येतात
गरीब आणिक श्रीमंत — भेद नसे हा बँकेंत
पाळाया तेथिल शिस्त — तिष्ठत सगळे रहातात
शिक्षा देउन खरोखरी — शिस्त लाविते ही बारी !

सिनेमागृहांत—

'प्रभात'मध्यें चला चला — नवीन 'शो' आजच आला
बाया पोरें घेऊन — टांगा आणिक ठरवून

थाटमाट करुनी सगळा घेउनियां अपुला मेळा
थिएटरवरती येऊन जाऊं नका हो परतून
यत्न करा तिकिटांसाठीं धडपड करुनी ती मोठी
पैसे घेउनि ते जास्त तिकिटें कोणी विकतात
तिकिटें घ्या त्यांच्याकडुनी आंत घुसा कांहीं करुनी
फसेल ना तर संकेत तिष्ठत राहुनि बारींत !

रेल्वे स्टेशनवर —

परगांवीं जाण्यासाठीं स्टेशनवरती जन जमती
आणि लढाई असतां ही प्रवास त्रासाचा होई
तिसऱ्या वर्गाचे जन ते हाल तयांचे भलभलते
तिकीट काढायासाठीं प्रत्येकाची धांदल ती
ओझें अन् सामानाचें नको तेधवां वाटतसे
यात्रा त्यांतुनि ती असतां गर्दीचा तोबा नुसता
तिकीट तें मिळणें हातीं दिव्य भयंकर ह्या जगतीं
मुंग्यांची ती रीघ बरी खोटी पण येथिल बारी !

पंढरपुरांत—देवाचियें द्वारीं—

चहूंकडे बारी धरुनी थकुनी गेला एक कुणी
जिवास येतां कंटाळा पंढरपुरला तो आला
विठ्ठलदर्शन घेण्याला आतुर त्यांतुन झालेला
होती त्या दिवसास परी कार्तिक एकादशी खरी
चहुंकडुनी त्या दिवसाला भक्तांचा मेळा आला
बारी पाहुनही तेथें नवल खरोखर त्या वाटे
अखेर त्यानें ओळखलें जीवन बारीमय सगळें
देवाच्याही दारांत बारी आहे नशिबांत !

---

## फराळाचा डबा !

डबा फराळाचा माझा कसा आज गेला
हपीसांमधूनी देवा ! कुणीं सांग नेला ?

उशिर फार झाला म्हणुनी जेवतां न कांहीं
डबा फराळाचा मी तो हपीसांत नेई
रोज ठेवितों त्या जागीं ठेवुनीच देई
कोण चोर येउनि त्याला दृष्टिआड केला ?

त्यांत मकर-संक्रांतीचा सुदिन तो असून
गोडधोड 'पक्वानें*' तीं प्रिया दे करून !
डबा नाहिंसा पण होतां, उपाशी बसून
कडक त्या भुकेनें माझा विकल जीव झाला !

डबा छान पितळेचा तो जणूं आज सोनें
बोहऱ्यास देउनि 'लुगडें' घेतला सखीनें
'हरवला !' तिला हें सांगूं कोणत्या मुखानें ?
रागवून माझ्याशीं ती धरिल ना अबोला ?

(माझा डबा हपीसमधील खास 'मुलींच्या खोलीं'त चुकून 'कोणीं तरी' नेला असा उडता सुगावा लागल्यावर— )

मस्करी पुरे, सखयांनो ! डबा द्या आणून
गांठ ती असे माझ्याशीं मनीं द्या ठसून !
एक दिवस ना तर मी तो 'कन्हय्या' बनून
डबे सर्व नेइन तुमचे करुनि मात्र हल्ला !!

(* 'केळींचें शिखरण व पुरी' हें माझ्या डब्यांतील पक्वान्नाचें नांव खास 'तिच्या'कडून सांगावें लागतें ना ? अरेरे ! ! )

---

## नापिकदादा !

खुंटावरती वडाखालती बसुनी हा नापिक
न्यहाळी अदबीनें ग्राहक !

लालभडक गरगरीत बांधी पागोटें तें जुनें
शिपाई संस्थानिक कीं बने !

धोतर मळकें वर करगोटा कुडता अंगावर
चालतो काढुनि छाती वर !

रुपयाइतुकें गंध कपाळीं चमकदार लाविलें
कपोलीं कल्लेही ठेविले !

चालत जातां करकर वाजे जोडा पायामधें
नाचते बाळी कानामधें !

वकिलाहातीं जशी 'बॅग' ती तैशी हा खाकुटीं
ठेवितो चमड्याची धोपटी !

धंदा नसतां पान खाउनीं तोंड किती रंगतें
सारखा बघे आरशामधें !

गिऱ्हाइकांच्या पायतणांना चर्मकार हेरतो
तसा हा मुखड्यांना पाहतो !

खूण करूनी हांक मारतां देवदूत हा कुणी
येतसे लगवगिनें धावुनी !

मधेंच कोणी आडत्रितांना वदे तया "व्हा पुढें
लौकरी येतों तुमच्याकडे !"

चटपट करुनी काम चालवी कारागिर हा भला
कला ही जीवन दे त्याजला !

करमणुकीस्तव कामामध्यें भाषण हा झोडतो
खरोखर वक्ता जणुं भासतो !

गप्पागोष्टी इतिहासांतिल तिखटमीठ लावुनी
सांगतो संशोधक हा कुणी !

राजकारणावरती चालू कठोर टीका करी
भासतो मुत्सद्दी का तरी ?

'सराट गोटा' करावयाला पटाईत हा सदा
हाय ! पण ग्राहक रडतो तदा !

'मालिशचंपी' करतांना पण जीव किती हा रमे
सारखें चोळुन घ्यावें गमे !

'बडे जेवढे मान तयांची माझ्या हातामधें'
—सांगतो पठ्या ऐटींमधें !

जावळ, मुंजी निघोत तेव्हां हटकुन ये सत्वर
आणितो वाजंत्रीही वर !

असेल ज्याच्या अंगीं मस्ती कुस्ती हा खेळिल
फडामधिं बक्षिस पण जिंकिल !!

---

## माहेरीं न्या !

[शारदा कायदा अंमलांत येण्यापूर्वीचा काल. तो– वृद्ध पेन्शनर. ती– कुमारिका. कविश्रेष्ठ श्री. तांबे यांच्या 'आईकडे न्या' या कवितेची क्षमा मागून !]

कोवळी
लालि लोपली
गुलाबी गालीं
'मज माहेरीं न्या,'– वदे आसवें आलीं !

शिरिं धरा
विनंती करा
रडे ना थांबे
'मज माहेरीं न्या,'– प्रिया तनूशीं झोंबे !

रोकडे
देउनी धडे
शिकविलें तिजला
'मज माहेरीं न्या,'– तोंड न हटवादीला !

सुंदरी
छानशी सरी
आणि घे बांकी
'मज माहेरीं न्या,'– बोल न अपुला टाकी !

खावया
कांहिं घे बया
किती लाडावूं ?
'मज माहेरीं न्या,'– कुठें सासरीं जाऊं !

प्रीतिची
पती-पत्निची
थोरवी गातां
'मज माहेरीं न्या,'– अन्य न करते वाता !

पेटिची
फोनोग्राफची
लाविली गोडी
'मज माहेरीं न्या,'– बरळत सुटते वेडी !

माहेर
तुझें किति दूर
जावयासाठीं
'मज माहेरीं न्या',– झडे सारखी घाटी !

खर्चण्या
मजा मारण्या
देउं किति पैका ?
'मज माहेरीं न्या',–घसा फोडिशी तूं कां ?

हरघडी
करुन फू:गडी
दाविला धाक
'मज माहेरीं न्या,'– फिरून वरती नाक !

भगवान !
कल्पना कोण
करिल रे त्याची
सासि हसुनी जातां वृद्ध वयांतिल ज्याची !!

---

## बकुल वृक्षास—

आकाशांतिल मेघ ते निरखुनी आनंदतो चातक
कांहीं वेळ तसें बघून तुजला मी मानितों कौतुक!
विश्रांतिस्थल हें तुझें विलसुनी देवालयासन्निध
डोळ्यांना दिपवी, मनास रिझवी त्वत्कार्य नामांकित!

जन्मापासुनि लीन राहुनि सदा श्रीशंकराच्यापुढें
नंदीच्यासम मंगलप्रद असें पावित्र्य तूंतें जडे!
शाखारूपि तुझ्या करां पसरुनी वायूसवें सारखीं—
बाळें सुंदर अर्पितोस 'कुसुमें' देवाकडे सार्थकीं!

पक्ष्यांना स्थलही निवान्त गमशी, देशी फळें गोडशीं
पांथांना दिवसा उन्हांत करशी छाया सुखाची तशी!
चंद्राच्या चढत्या कलेसम तुझ्या भक्तीवरी तोषुनी
दीर्घायुष्य करी; सुरेश तुजला मोक्षांप्रती नेउनी!

"मोक्षाचें पद मानवांस जगतीं कोठून तें लाभणें!
जो ना मंगल ईशनाम भजतो त्याचें वृथा हो जिणें!
सत्कार्यांत सदा निमग्न असणें, स्वार्थास निर्दाळुनी"
मोक्षाचे मज मार्ग हे प्रगटशी बोधामृता पाजुनी!

—



(चित्रशाळेच्या कृपेनें)

भगवान् गौतम बुद्ध

(बनारसनजीक सारनाथ येथील ध्यानस्थ बुद्धमूर्ति)

# भगवान् गौतम बुद्ध

आनंदीआनंद कशाचा स्वर्गामध्यें झाला
इंद्राचा सत्कार आज तो देवांनीं कां केला ?

असित ऋषींना प्रश्न पडे कीं उत्सव कसला चाले
कारण त्याचें देवांनीं मग आनंदें त्यां कथिलें—!

पृथ्वीवरती शाक्यकुलीं घे आज नवा अवतार
'बोधिसत्व' हें नांव तयाचें गर्जा जयजयकार !

सोडुनिया तप असित ऋषी मग आतुरतेनें उठले
'कपिलवस्तु' नगरींत जाउनी मनांत मोहित झाले !

'शुद्धोधन' नांवाचा होता राजा राज्य करीत
'मायादेवी' राणी झाली होती आज प्रसूत !

अनेक पंडित ब्राह्मण आले भविष्य वर्तायाला
'चक्रवर्ति हा कमार होइल' जो तो तेव्हां वदला !

अलोट लक्षण वैभव बघुनी कुमार सिद्धार्थाचें
असित ऋषींनीं भविष्य केलें— अखेर ठरलें साचें !

'मनुष्यजातीमधें श्रेष्ठ हा सकलांहुनि ठरणार
होईल हा 'संबुद्ध' आणखी देवाचा अवतार !'

सात दिवस जों नाहिंत झाले जन्मुनि सिद्धार्थाला
'मायादेवी' आई त्याची सोडुनि गेली त्याला !

'मुलगा अपुला संन्यासी का बनेल' ?– ह्याच विचारीं
शुद्धोधन तो सदैव होई मनांत दुःखी भारी !

दुःखाचा संपर्क मुलाला लागुं न देतां कांहीं
योग्य तऱ्हेनें खास स्वतः तो चिंता त्याची वाही !

वैराग्याचे विचार कसले मनीं न शिरण्याकरितां
निजपुत्राचा विवाह त्यानें सत्वर केला आतां !

'यशोधरा' ही सुंदर पत्नी लाभे सिद्धार्थाला
'राहुल' नामक तिच्यापासुनी पुत्र तयांही झाला !

आनंदाचें जिकडेतिकडे होतें वातावरण
दुःखाचें तें सिद्धार्थाला नव्हतें कसलें स्मरण !

प्रजाजनांना भेटाया तो जेव्हां म्हणुनी जाई
दुःखद दृष्यें त्या न दिसावीं अशी योजना होई !

हाय ! परंतू घडावयाचें कांहीं नाहीं चुकतें
सिद्धार्थाच्या जीवितास नव वळण यायचें होतें !

एके दिवशीं हिंडत असतां मार्गामध्यें त्याला
व्याधिग्रस्त म्हातारा कोणी दृष्टिस पडुनी आला !

वृद्धपणीं दारिद्र्य आणखी हाल तयाचे बघुनी
सिद्धार्थाचें हृदय कोवळें गेलें झणिं करपूनी !

शेतामध्यें शेतकरी मग पुढती त्याला दिसला
उन्हामधें जो काम करूनी थकुनी होता गेला !

पोटासाठीं— देहपालनासाठीं इतुके हाल
बघुनि तयाचे, सिद्धार्थाच्या मनांत उठला जाळ !

कर्मधर्मसंयोग असा कीं नंतर मार्गामध्यें
दहनविधीस्तव प्रेत तयाला दिसलें जातांना तें !

'मरण कुणाला जगामधें ह्या येइ न का चुकवाया
यत्न मानवी त्यापुढती का जाती ठरुनी वायां ?'

–विचारांत ह्या गढुनि बिचारा थकुनी अगदीं गेला
दु:खीकष्टी मनांत होउन घरास परतुन आला !

व्याधि, जरा, अन् मृत्यूनें कां मनुष्य दु:खित होई ?
दु:खाचें तें मूळ कुठें तो विचार करुनी पाही !

शस्त्रग्रहणामुळें जगीं ह्या होती भांडणतंटे
कारण नसतां हत्या करणें पाप नव्हे का मोठें ?

बाहुबलानें क्षत्रिय लुटती संपत्ती समरांत
पापाचें धन व्यर्थ खर्चुनी देती ते यज्ञांत !

ह्या गोष्टींचा सिद्धार्थाला अगदीं ये कंटाळा
निवृत्तीचा लगेच त्याला सुचला मार्ग निराळा !

राज्यपदाचा, संपत्तीचा, आणिक संसाराचा
त्याग तयानें करून धरिला रस्ता थेट वनाचा !

तपसामर्थ्याविना न होइल सत्याचा तो शोध
परमेश्वरचिंतनीं जिवाला घडून येइल बोध !

'आरादकालम'कडुनी घेउनि दीक्षा संन्यासाची
सिद्धार्थानें वाट पुढें मग धरली 'उरुवेलेची' !

नैरंजन सरितेच्या कांठीं बघुनी शान्त ठिकाण
सिद्धार्थानें तप आचरिलें मांडुनि अपुलें ठाण !

करुणा, मुदिता आणि उपेक्षा यांवर केलें ध्यान
हटयोगाचें, उपोषणाचें धरिलें व्रतआचरण !

लोभ, द्वेष, मद, मत्सर आणिक कामवासना सगळ्या
मनोनिग्रहापुढें तयाच्या कायम लोपुनि गेल्या !

'मारा'[3]नें त्या भुलवायाला प्रयत्न नाना केले
हाय ! सर्व ते फसून त्याचें नाहीं मन पालटलें !

तऱ्हेतऱ्हेचीं खडतर त्यानें व्रत-वैकल्यें केलीं
तथापि त्याच्या मनास शांती प्राप्त न अजुनी झाली !

देहदंड सोसणें असें तें साधन मनशुद्धीचें
दुःख तयानें जगांतलें तें कमती होइल कैसें ?

लोकांचें कल्याण हातुनी कांहिं न जर होणार
मोक्षसिद्धि लाभून स्वताला काय असें मिळणार ?

अंतर्मुख ह्यापरी तयाची दृष्टी बनुनी गेली
अखेर सेवाधर्माची त्या दिशा नवी सांपडली !

'मीपण' त्यजिल्याविना न होतो सेवाधर्म कशाचा
सर्वांभूतीं प्रेम हवें तें त्यांतच मार्ग सुखाचा !

ना फलप्राप्ती कारण नसतां देहदंड सोसून
सिद्धार्थानें अविचारी तो मार्ग दिला सोडून !

मिळेल कोठें आयुष्याचें अंतिम सारें ज्ञान
रात्रंदिन तज्जिवास गेली तळमळ ती लागून !

वैशाखीं पुनवेस एकदां पिंपलवृक्षाखालीं
चिंतन करितां ज्ञानाची त्या अखेर प्राप्ती झाली !

निर्वाणाचा मार्ग गवसला गौतम सिद्धार्थाला
तेव्हांपासुनि 'बुद्ध' अशा तो नांवारूपा आला !

स्थान ऋषींचें 'सारनाथ' जें काशीक्षेत्रीं तेथें
ज्ञानामृत पाजिलें तयानें आधीं पांच जणांतें !

शिष्य बनूनी बुद्धाचे ते जिकडे तिकडे फिरले
निजधर्माचें महत्त्व त्यांनीं सर्व जगाला कथिलें !

निर्वाणाचा–प्रेमाचा नी शान्तीचा–सत्याचा–
बुद्ध धर्म तो !– जगांत सत्वर प्रचार झाला त्याचा !

घेउनि 'प्रव्रज्या' जन बनले बुद्धाचे अनुयायी
भिक्षूंचे ते संघ जहाले स्थापन ठायीं ठायीं !

जय बुद्धाचा– जय धर्माचा– जय संघाचा झाला
मंत्र 'अहिंसा' बुद्धाचा तो ज्याला त्याला पटला !

दशावतारांमधें लाभलें बुद्धाला तें स्थान
तत्कीर्ती गातसे अजूनी जपान-हिंदुस्थान !

चारित्र्यावर आज तयाच्या स्फुरलें मजला गान
'सारनाथ' ह्या रम्य स्थलीं तें जातों मी गाऊन !

१ आरादकालम– एक साधु.
२ उरुवेल– गयेजवळचें एक रम्य ठिकाण.
३ मार– मनांत विषयसुख निर्माण करून देणारा.

सारनाथ–बनारस,
ता. १०।६।१९४४

—

# बर्नेट्‌ मारकस्‌*

(बर्नेट्‌ मारकस्‌ हा कुणी साहेब नाहीं ! खडकीच्या मिलिटरी डेअरी फार्ममधील तो एक प्रख्यात 'वळू' असून त्याला पाहिल्यावर कवीस 'मस्त' स्फूर्ति येऊन ही कविता बाहेर पडली ! जिते रहो जिवा !)

धन्य वळू हा खास !
अफाट रानें अंवतींभंवतीं
काळी काळी सगळी माती
सुंदर त्यावर नटली शेती
प्रशान्त जागीं वृक्षासन्निध ह्याचा नित्य निवास !
छप्पर पत्र्याचें तें वरती
हवी तशी ती जागा पुढती
कुंपण कांटेरी त्याभंवतीं
बंदीमध्यें जीवन ह्याचें नाहीं मात्र उदास !
निसर्ग देई सदैव थारा
भिरभिर वाहे संतत वारा
प्रखर उन्हाचा नाहीं मारा
सुंदर वातावरणीं ह्याचा होतो देहविकास !
मनाप्रमाणें खाया मिळतें
कमी न कांहीं कसलें पडतें
बादशहासम जीवन गमतें
गडीमाणसें झुलती ह्याला कसला ना वनवास !
हत्तीलाही लाजविणारी
शरीरयष्टी कणखर भारी
अचाट अंगीं शक्ती सारी
टक्कर देउन कोणाचाही करील सत्यानास !

आफ्रिकेंत हा जन्म पावला
कोणी येथें त्यास आणला ?
परदेशी हा कायम झाला
जन्मभूमिचा मनांत ठेवी जिवंत पण इतिहास !

कर्तव्याला कधीं न चुकतो
प्रजोत्पादन उत्तम करतो
त्यास्तव जीवन अपुलें म्हणतो
कलेंस माझ्या जोड न कोठें सांगे हा सकलांस !

* बर्नेट् मारकस्— जन्म- दक्षिण आफ्रिका. ता. १२।५।४१.

---

## एक मागणें

काशीचे पंडे आणखी बडवे पंढरिचे
चालतील देवा ! लाटले त्यांनीं जरि पैसे !

दिल्लीचे सोदे मवाली आणिक ममईचे
परवडले तेहीं कापुनी जरि घेतात खिसे !

गुजर मारवाडी असो वा पठाण काबुलचे
तेही रुचतील भयंकर व्याज जरी त्यांचें !

नको परी देवा ! भेटवूं ह्या जन्मामध्यें
काळिज नसलेले भामटे मम गांवातिल* ते !

* माझें गांव— पुणें. अरेरे ! हें सुद्धां सांगावें लागतें ना ?

---

## मित्राच्या शेतवाडीवर !

नदीकिनारीं खेडें वसलें 'काष्टी' हें सुंदर
वाटतो त्याविषयीं आदर !
जिवलग माझ्या मित्राचें हें ठिकाण वडिलार्जित
बघुनि मी झालों आनंदित !
सभोंवतालीं दूर दूर ते डोंगर विस्तारले
मधोमध खेडें हें शोभलें !
गांवापासुनि नजीक अगदीं वाहे जलवाहिनी
गातसे गायन कीं मोहिनी ?
शेतावर जावयास वाटा पसरुनि गेल्या किती
नागिणी ह्याच कुणी भासती !
हंगामाचे दिवस मजेचे येउनि आतां कसे
वनश्री नटलेली ही दिसे !
शेतांत शाळुचीं कणसें फोफावलीं
हरबरा-तुरींनीं शोभा बहु आणली
गडगंज संपदा वर्षीं ह्या जाहली
भुईमुगाचा रम्य गालिचा, सोनफुलें त्यावरी–
पसरला लांब किती हा तरी !

आम्रतरूंचीं अनेक झाडें जिथें तिथें भेटती
सावली गार तयांखालती !
भणभण वारा शेतामधुनी गोड किती वाहतो
जीव त्या नादानें डोलतो !
जिकडे तिकडे मातीचा तो सुगंध फैलावला
फुलांचा वास फिका वाटला !

म | ६९५७

ह्या झाडावर त्या झाडावर दिवसभरी हिंडुनी
विहग ते किलबिल करिती ध्वनी !
कंठ मोकळा करुनि गातसे कुठेंतरी कोकिळा
बोलते– 'वसंत कीं पातला' !
मम मित्राचें शेत अतां तर हिरवें हिरवें दिसे
पाहुनी जिवास जडलें पिसें !
अप्रतीम जोडी बैलांची ती किती
भिरभीर सारखी मोट कशी ओढती
घुंगूर गळ्यांतिल त्यांच्या ते वाजती
पाटापाटामधून झुळझुळ निर्मळ जल वाहतें
पिकाला सर्वकडे पोंचतें !

शेताजवळी उभारलेल्या दिसती त्या झोंपड्या
हुदळती ज्यांभंवतीं कोंबड्या !
गोठ्यामध्यें गायवासरें आणि तशा शेरड्या
मारती आनंदानें उड्या !
काळीं कुत्रीं अनोळखी कुणि आल्यावर भुंकुन
पहारा करती रात्रंदिन !
शेतकऱ्यांचीं मुलें माकडांपरी स्वैर खेळती
तयांना चिंता नच माहिती !
पाण्यासाठीं घेउनि डोईं मातीच्या घागरी
स्त्रिया त्या जाती विहिरींवरी !
शेतामध्यें बारी धरती कुणी पदर खोउनी
हांकतो मोट जेधवा धनी !
अन् चपल मुलें तीं चढून माळ्यावर
सारखीं फिरविती गोफण तीं गरगर
जातात तयानें दूर पळुनि पांखरं

शाळूच्या कणसांचे दाणे चमकुनि मोत्यांपरी
डुलविती माना वाऱ्यावरी !

ऐन दुपारीं शेतावरती पूर्ण वसे शान्तता
सूर्य तो डोक्यावर ये अतां !
गुरेंवासरें चरावया जीं गेलीं रानामधें
सर्व तीं बसलीं छायेमधें !
सकाळपासुन भिरभिरणारी मोट अतां थांबली
वेळ ती सुट्टीची जाहली !
चारापाणी जनावरांना देउनि झाल्यावरी
कृषीवल खातो मग भाकरी !
ह्या वेळीं मज मित्रासोबत अकस्मात पाहुनी
कृषीवल गेले मनिं तोषुनी !
झाडाखालीं विश्रांतीला अंथरुनी कांबळी
म्हणाले– 'बसा इथें मंडळी' !
कणसं भाजुन लगेच त्यांनीं हुरडा तो बनवुनी
ठेविला थाळीभर आणुनी !
किति गोडी त्याची अवीट ती भासली
लसणीची चटणी सोबत त्या लाभली
खाऊन मनाची तृप्ति पुरी जाहली !
सुरम्य हें स्थल सोडुनि जातां येइन केव्हां पुन्हा—
ध्यास हा लागुनि गेला मना ! !

काष्टी–दौंड, १९४४.

## नटीचें रडगाणें

हाय ! हाय ! मी कुठून ती नटी जहालें
'सभ्य स्त्री' नांव खरें पार मम बुडालें !
पडुनि कशी मजसि भुरळ
आप्त इष्ट त्यजुनि सकल
सिनेमांत कीर्ती, धन मिळविण्या निघालें !
नट आणिक दिग्दर्शक
प्रेमवीर सर्व लोक
सांगुं कसें करति तिथें नित्य प्रेमचाळे !
संगतींत मी त्यांच्या
आधिन हो व्यसनांच्या
'मद्य', 'रेस'पायीं धन जाइ जें मिळालें !
मजविषयीं शंका त्या
घेती जन भलभलत्या
शीलावर मम खुशाल घालतात घाले !
रूप, गुणांविषयीं तर
लेखक ना करुनि कदर
टीकेचें ओकतात गरळ तें निराळें !
धंदा हा पत्करला
काय गुन्हा हो घडला ?
कला-प्रेम रसिकांचें वाटतें निमालें !
यौवन जों रसरसतें
काम कुठें तरि मिळतें
सरतां तें, जग वदेल– 'बाई ! कर काळें !!'

## तो कारकून—

## —आणि लेखक !

असे सरकारी कुणी कारकून
काम करणें तें गमे त्यास न्यून !
मान मोठा जरि नसे लाभलेला
मनीं समजे तो शाहणा स्वताला !

मिळे दैवानें त्यास जो पगार
त्यास वाटे तो अल्प बेसुमार !
वृत्ति नाहीं त्यांतून समाधानी
मात्र वरुनी दाखवी स्वाभिमानी !

काम कोठेंही जरी तयें केलें
'फार' म्हणुनी तो मदत हवी बोले !
देह ज्याचा मुळचाच सुदाम्याचा
भार कसला त्यां सहन व्हावयाचा ?

व्यसन नाहीं त्या पान-तमाखूचें
वेड मोठें पण फार लेखनाचें !
कथा-काव्यें इंग्रजी सुप्रसिद्ध
लिहित असतो चोरून मराठींत !

स्वतालागीं समजून 'ब्रह्मचारी'
मात्र प्रीतीच्या कथा तो चितारी !
विवाहाचा काढतां प्रश्न त्यासी
स्तब्ध राही हा नवा रामदासी !

फिरायाला जेधवां दूर जातो
छुपा 'कॅमेरा' जवळ बाळगीतो
अचुक दिसतां मार्गांत 'मस्त' बाई
तिचा बेमालुम 'स्नॅपशॉट' घेई !

थोर व्यक्तींची घ्यावयास भेट
काढि दौरा हा करुनि पायपीट !
मिळे त्यांतुनि जर 'नटी' अकस्मात
मुलाखत तो रंगवी मासिकांत !

पुरोगामी हा म्हणवितो स्वताला
त्यजुनि कमरेचें बांधि मस्तकाला !
दौड अकलेची मारि लांब लांब
घाल देवा ! तरि त्यास तूं लगाम ! !

---

# मी आणि मामा

घरीं तो सोडमुंजीचा निघाला सोहळा माझा
बघाया आप्तही आले स्वधर्मांतील त्या मौजा !

बटू तो ब्रह्मचारी मी निघें जों काशियात्रेला
अहा ! धांवूनिया मामा मला ये थांबवायाला !

वदे– 'रागावुनी ऐसा नको काशीस रे जाऊं
तुला देईन मी कन्या कशी माघार घे पाहूं !'

'बरें !' बोलूनिया तेव्हां घरा ये आमुची 'स्वारी'
मनीं ते शब्द मामांचे परंतू बिंबले भारी !

पहा गोष्टीस त्या आतां पुरेसा लोटला काळ
वयें मी वाढुनी, पेटे जिव्हारीं प्रीतिचा जाळ !

कराया मागणी गेलों मुलीची खास मामांना
स्मृती मागील शब्दांची करूनी मीं दिली त्यांना !

विडी फुंकूनिया मामा म्हणाले– 'थाप ती होती !
धुराचे लोट हे जैसे फुका ते शब्द मी काढीं !'

धुराचे लोट पाहूनी तसे ते जाणुनी शब्द
कपाळा हात मारूनी अरेरे ! जाहलों सर्द ! !

---

## फोटोग्राफर तो—

फोटोग्राफर तो नवोदित कुणी होता बरें एकला
त्याचें लग्न न जाहलें अजुनही 'भाई'परी राहिला !
'कॅमेरा' करिं घेउनी फिरतसे वेड्यापरी सारखा
दृष्टीला रमणीय दृश्य दिसतां घे 'स्नॅप' तो नेमका !

फोटो मासिक-पत्रकांस वशिला लावूनियां धाडितो
प्रेमाच्या कविता निरर्थक तशा छापूनही आणितो !
कीर्ती आणिक संपदा मिळविण्या अत्यंत लोभावला
दोघींनीं पण त्याजला अजुनही ना थांग लागूं दिला !

त्याच्या दृष्टिस एकदां पडुन ये मार्गांत बाला कुणी
होती सुंदर, कोमलांग, हंसरी (सांगूं किती वर्णुनी ?)
बेमालूम तिचा तिला चुकवुनी फोटो तयें काढिला
'बाला मिस्किल' नांव देंउन वरी तो मासिकीं छापिला !

घेऊनी परवानगी नच; बळें फोटो असा छापिला
बालेनें बघुनी मुकाट अपुल्या तो संग्रहीं ठेविला !
फोटोग्राफर हेरुनी मग तिनें त्या हातही दाविला
त्याचें 'जीवनचित्र' ती चितरतां घायाळ तो जाहला !!

---

## खोली मिळेल तर शपथ !

खोली म्हणून कांहीं खोली कुठें मिळेना
खोलीविना जिवाची झाली अपार दैना !

'बेकार', 'पोळ' ऐसा शिक्का सदा कपाळीं
हें युद्ध मात्र येतां ती नोकरी मिळाली !

लाभे पगार आतां संपून दैन्य जाई
चिंता परी जिवाला लागून अन्य राही !

लग्नाविना अरेरे ! मी हा जगांत प्राणी
कैशी मनास माझ्या येई न पोर कोणी ?

देवास त्या अखेरी माझीच कींव येई
दृष्टीसमोर बाला धाडून एक देई !

पाहून तीच बाला मी अंतरांत धालों
प्रीती तिची लुटाया वेडा पुरा जहालों !

मार्गीं सदा सखीच्या जाऊन सोबतीला
संधान बांधलें मीं सांगूं कसें जगाला ?

राहावया परंतू खोली कुठें न भेटे
(एकान्त गांठ नाहीं !) मोठी उणीव वाटे !

ऐशी कशी लढाई खोली कुठें मिळेना
खोलीविना जिवाची झाली अपार दैना !

## तंट्या भिल्ल

उत्तरेस त्या सातपुड्याच्या डोंगररानांत
तंट्या नामक वीर निपजला भिल्ल जमातींत !

भाउबंदकीमुळें प्रथम तो गांजुनिया गेला
कोर्टामध्यें पाय ठेवतां अपराधी ठरला !

गुन्हा तयाचा नसतां त्याला शिक्षा ती झाली
न्यायदेवता बघुनि आंधळी चीड तया आली !

असुरी सत्ता धनिकांची दे दुबळ्यांना त्रास
शल्य भयंकर त्यांत तयाच्या डसलें हृदयास !

सरकाराचा, धनिकांचाही शत्रू तो बनला
दोघांचाही सूड घ्यावया उतावळा झाला !

गरिबांचे ते हाल पाहुनी कळवळला फार
मनांत ठरवी अन्यायाचा करणें प्रतिकार !

दैन्यावस्था दुबळ्यांची ती नष्ट करायाला
सर्वस्वाची होळी करुनी नंगा तो बनला !

गांवोगांवीं जाळपोळ ती करून हकनाक
श्रीमंतांना लुटिलें त्यानें दाखवुनी धाक !

मुलुखगिरीला राजरोस तो पडून बाहेर
द्रव्य लुटाया मनांत येइल तसे करी थेर !

एक दिलाचे भिल्ल लोक ते अपुलेसे केले
दुष्मानांचे मुडदे त्यानें पाडुनिया दिधले !

'मरी आईचा चांग भलं !' तो गर्जे समरांत
त्या देवीचा गोड कृपेचा असे तया हात !

लूटमार ती करून सारी गरिबांना देई
गरिबांचा सम्राट खरोखर बनून तो जाई !

'दया हाच तो धर्म' त्याचा ठरूनिया गेला
दिलदारी ती शोभुनि जाई शिपाइबाण्याला !

'चोर', 'दरोडेखोर' जहाला वाली दुबळ्यांचा
काळ परंतू सरकाराचा आणिक धनिकांचा !

होळकरांचा प्रांत सर्व तो दणाणुनी टाकी
इंग्रज सरकारास आणिलें त्यानें नउ नाकीं !

'पंचेचाळिस हजार रुपये' अखेर दोघांनीं
इनाम जाहिर केलें देइल धरून त्या कोणी !

जिवंत त्याला पकडायाची कुणा न हो छाती
शरण तयाला जो तो येई धरून तृण दातीं !

'तुला शिपाई करून देऊं जागा ती मोठी'
लालुच सरकारानें त्याला दाखविली खोटी !

'माफीचें फर्मान' बनावट त्याला पाठविलें
सरकारानें बहुत यत्न त्या धरावया केले !

मनांत सरकाराविषयीं ज्या कायमचा राग
भुलथापांना भुलला नाहीं जिवंत तो वाघ !

दगलबाज जन इंग्रजांस पण होउन अंकीत
वाघ दिला हा अखेर त्यांनीं धरून जाळींत !

खून, दरोड्यांबद्दल त्यावर लादुनिया आळ
फांशीची ती शिक्षा त्याला झाली तात्काळ !

आनंदानें हांसत तंट्या फांसावर चढला
वीराचें तें मरण खरोखर लाभुनि तो गेला !

4209.

अन्नासाठीं गरिबांच्या जो लढुनि मरे वीर
कोण दरोडेखोर तयाला जगतीं वदणार ?
श्रीमंतांना धूळ चारिली जगवाया दीन
त्या तंट्याला म्हणेल का कुणि वृत्तीचा हीन ?
तंट्या हा जर जन्म पावता दुसऱ्या देशांत
मातृभूमिचे पांग फेडता चमकुनि जगतांत !
उदो उदो पण हिंदुस्थानीं त्याचा नच होई
परदास्यांतिल देश अरेरे ! आड तया येई ! !

---

## चटकचांदणी— ?

चालतांना तूज जेव्हां पाठमोरी पाहिलें
चांदणी तूं भासुनीया चित्त हें वेडावलें !
चाल तूझी देखतां, तूं राजहंसी वाटुनी
डोलुनी हें देहतारूं जाय कोठें ना कळे !
गोल साडी झिर्झरी अन् लांब मागें शेपटा
वास फेकी चंपकाचें फूल तूं जें खोविलें !
मारुनी तेव्हां अघाडी गांठ घेऊनी तुझी
दर्शनाचें सौख्य घ्यावें मन्मनानें वांछिलें !
होइ दृष्टादृष्ट जेव्हां व्यर्थ वाटे धांवलों
होउनी मी सर्द तेव्हां नेत्र माझे झांकले !
(चांदणी नाहीं परंतू तूं भवानी वेसवा !)
दर्शनानें तूं मला ग लाजवीलें चांगलें ! !

---

## अश्लीलमार्तंड

[श्री. कृष्णराव मराठे यांची सपशेल माफी मागून !]

कथा, काव्यें, नाटकें वाचतांना
सिनेमाही ते तसे पाहतांना
जरा कोठें 'अश्लील' दिसुन येतें
हाय ! माझ्या हृदयांत डांचतें तें !

संस्कृतीची ना चाड लेखकांना
मान नाहीं ते देत अंगनांना !
स्वैरतेचे डोक्यांत नवविचार
धर्म त्यांनीं सोडून दिला पार !

कलावंतांना काय ह्या म्हणावें
नीट मार्गावर कसें त्यां अणावें ?
कसें वाङ्मय होईल तें पवित्र
ध्यास लागे मज हाच अहोरात्र !

कुणी देवांना ठेवतात नांवें
कसें त्यांना 'पावित्र्य' तें न ठावें ?
लेख 'लैंगिक' ते कुणी खरडतात
कसा माझा दाखवूं त्यांस हात ?

ग्रंथपठनीं 'अश्लील' ये दिसून
टिपण त्याचें ठेवितों मी करून !
वेळ येतां भरवून सभा खास
दाखवीतों वाचून 'तें' जनांस !

कुणावरती फिर्याद गुदरण्याला
चेव मजला येतसे कैक वेळां !

लेखकांची चांबडी लोंबवून
त्यांस देतों भुदंड ठोठवून !

संस्कृतीच्या बाहेर जर कुठून
सिनेमाचा ये भाग आढळून !
अर्ज करुनी 'सेन्सॉर-कमीटी'ला
भाग तितुका लावितों कापण्याला !

कुठें संमेलन वाङ्मयीन होतें
नेमका मी घेतसें धांव तेथें !
सभ्यतेचा आणून सर्व आव
'निषेधा'चा मी मांडितों ठराव !

सभ्य (!) म्हणती— 'उद्योग काय नाहीं'
व्यर्थ देतां उपसून घाण कां ही ?
अन्न घरचें खाऊन हो फुकाच्या—
भाकरी कां भाजतां लष्कराच्या ?

काय ऐशा सुज्ञांस (!) उत्तरावें ?
कसें त्यांना ठाऊक तें नसावें !—
(नांव अपुलें जगतांत व्हावयाला
दिव्य हातुन का नको घडायाला ?)

काम नसतां नापीक कैक वेळां
तुंबड्या त्या लावितो दिवाळीला !
कार्य माझें हें जरी त्याप्रमाणें
धन्य ! म्हटलें मज पाहिजे जगानें ! !

## हरिद्वार !

हिमालयाच्या पायथ्यास जें लहानसें गांव
सुंदर आणिक मंगलमय त्या हरिद्वार नांव !

हिमालयाच्या भव्य टेकड्या बाजूला दोन्ही
वहात येते पवित्र गंगा नदी तयांमधुनी !

गंगेसाठीं हिमालयानें केलें जणुं दार
गंगाद्वाराला त्या म्हणती कुणी हरिद्वार !

जिकडे तिकडे समीप दिसती हिमगिरिच्या रांगा
प्रथम गांव हें हरिद्वार कीं जेथें ये गंगा !

किती टेकड्या एकावरती एक अशा दिसती
हिमसेकाचें धवल वस्त्र त्या सगळ्या पांघरती !

धवलमयी ही पर्वतराजी बघतांना वाटे
शुभ्र ढगांचा समुदाय का अवतरला येथें ?

धवलगिरीचा— धवलढगांचा सगम कीं झाला
सभोंवतालीं कापुस उधळुनि वाऱ्यानें दिधला ?

गौरीशंकर, धवलगिरी अन् कांचनगंगा ती
शिखरें वदती— हिमालयाचा उंच ध्वज जगतीं !

बर्फाच्छादित शिखरें सारीं नभास कीं भिडती
जमीन-अस्मानाची एकी करावया धजती !

स्वर्गीय सोपानाचा येथें मार्ग खुला झाला
प्रवाह गंगेचा त्या मार्गीं दिग्दर्शक बनला !

स्वर्गामधुनी गंगा जेव्हा पहिल्यानें आली
उमापतीनें शिरावरी निज धारण ती केली !

तेथुन गंगा हिमालयाच्या ये माथ्यावरती
वहात वेगें हरिद्वाराला नंतर आली ती !

सुरम्य ऐशा स्थलीं अहा तें गंगेचें पाणी
थयथय नाचे आनंदाचीं गाउनिया गाणीं !

आनंदाचीं गाणीं सगळीं वैदिक धर्माचीं
उत्साहाचीं– मांगल्याचीं– सात्त्विक तेजाचीं !

ऐन उन्हाळ्यामधें होउनी बर्फाचा चूर
नवल नव्हे का अलोट येतो गंगेला पूर !

लाटावरती उसळुनि लाटा खडकावर कोठें–
आपटतांना चुरा रुपेरी उडतो कीं वाटे !

शुभ्र स्फटिकासमान निर्मळ पाणी गंगेचें
पवित्र आणिक तीर्थ जहालें दैविक शक्तीचें !

हिरवे हिरवे लहानमोठे वृक्ष तिच्याभंवतीं
सृष्टिसतीच्या सौंदर्याला येथें ये भरती !

तऱ्हेतऱ्हेचे उडुगण पक्षी सृष्टीचे भाट
पावित्र्याचें स्तोत्र तिच्या ते उडून गातात !

प्रशान्त स्थल हें मांगल्याचें क्षेत्र खरें गमतें
नितान्त सुंदर ह्यांसम जगतीं कुठें न आढळतें !

पवित्र असल्या क्षेत्रीं यात्रा दरदिवसा भरते
यात्रा येथिल प्रचंड बघुनी प्रफुल्ल मन होतें !

सकाळ संध्याकाळीं करती जन गंगास्नान
धार्मिक कृत्यामधें होतसे जो तो रममाण !

सूर्यास्ताला घांटावरती दंगल ती उडते
मंगल दंगल बघून मानस पवित्रमय बनतें !

'श्रीहरिच्या पायरीवरी' ती पूजा जैं चाले
जिकडे तिकडे मांगल्याचा मधुर नाद खेळे !

'बिर्लाघंटाघरांतुनी' ये मंजुळ आवाज
चाले गंगामाताजीचा संतत जयघोष !

घाटावरती रंग येतसे कथा-कीर्तनाला
भजनपूजनीं स्त्री-पुरुषांचा मेळा तो रमला !

साधुसंत ते धर्मावरती देती व्याख्यान
पेटी-तबल्यावरती चाले गवयाचें गान !

गंगामाइस ओवाळाया लागे जैं वात
आरतींत त्या गढून जातो गरीब-श्रीमंत !

विविध फुलांचे द्रोण तयांवर लावुनिया वात
जो तो देई सोडुनि त्यांना पवित्र गंगेत !

अपूर्व शोभा जलावरी तैं दिसते नयनांला
रम्य गालिचा विविध फुलांचा वाटे अंथरला !

द्रोणांमधले मंद मंद ते दीपक जळणारे
नभांतले कीं लुकलुकणारे अवतरले तारे !

नंदनवनिंची शोभा सारी प्रगट इथें होई
स्वर्गच सगळा धांवुनि किंवा धरेवरी येई !

ऋषीश्वरांच्या तपोबलाचें मंगलमय स्थान
हरिद्वार हें ! इथेंच मज ये कळून निर्वाण !

निर्वाणाचा निवास सोडुन जाउं नये कोठें
इथें रहावें– भजन करावें– मनास हें वाटे !

स्वर्गसुखाची नितान्त गोडी अनुभवितों येथें
रम्य स्थलीं ह्या जीवनयात्रा संपावी गमतें !

चुकून आलें मरण मला जर परक्या प्रांतात
हरिद्वाराला पडोत अस्थी पवित्र गंगेंत ! !

हरिद्वार,
ता. १४।६।४४

---

## लगिनघाई !

तिच्यासंगें फिरतोस कशासाठीं ?
तुझ्याविषयीं आक्षेप लोक घेती !
प्रेम जमलें का तिचें आणि तूझें
सांग मित्रा ! मज सत्य तें असे जें !

मित्र बोले—"छे ! नव्हे तसें कांहीं
तिला अपुली मी मानतसें ताई !
स्नेह अमुचा हा नित्य वाढणार
लोकनिंदा मी तुच्छ लेखणार !"

"बरें !" म्हणुनी मी मूग गिळुन राही
नूर तिकडे बदलून मित्र देई !
बंधु-भगिनीचें त्यजुनि अतां नातें
(प्रेम त्यानें तिजसवें जुगविलें तें !)

प्रेमरंगीं रंगतां जीव दोन
हाय ! आलें भलतेंच तें घडून !
दिवस गेले 'लोटून' तिला कांहीं
आणि झाली दोघांस 'लगिनघाई' ! !

---



कै. म. म. द. वा. पोतदार
ग्रंथ संग्रह

# तरुणींचा ताफा !

[सध्यांच्या युद्धजन्य परिस्थितींत नोकरी पटकाविण्यासाठीं एका 'रूक्ष' ऑफिसांत आलेला 'तरुणींचा ताफा' पाहून सदरहू कविता स्फुरण पावली आहे !]

चुकून आला आज कचेरिंत ताफा तरुणींचा
बागबगीचा फुलला खडतर वातावरणाचा !

एकामागुन एक किती ह्या मुली इथें जमल्या
माळेमधल्या मुग्ध कळ्या कीं दिसती फुललेल्या !

जाइ, जुई, मोगरा, मालती, गुलाब, शेवंती
सुवास उधळत सर्व तऱ्हेचीं सुमनें हीं येती ?

आकाशांतिल लुकलुकणाऱ्या अवतरल्या तारा
कारंजाच्या उडून किंवा आल्या जलधारा !

गंधर्वाचें विमान नटलें दिव्य अप्सरांनीं
'छत्र्या' घेउनि उड्या टाकिल्या काय इथें त्यांनीं ?

'नागकन्यका' भरून आली कोंकणची नाव
पोटासाठीं इथें घेतली सर्वांनीं धांव ?

गंगेवरती तरंगणाऱ्या दीपांच्या माला
हांसत, नाचत इथें पातल्या किंवा वनमाला ?

फूलपांखरें, कबूतरें छे ! चिमण्या गुलजार
मनांत आल्या धरून कसल्या आशा दमदार ?

बुलबुल, भारद्वाज, कोकिला, मयूर, चंडोल
त्या पक्ष्यांचा 'ऑर्केस्ट्रा' हा जमला बहुमोल !

सुवर्ण, चांदी, हिरे, माणकें, जवाहीर, मोतीं
सराफजीच्या तिजोरींतुनी प्रदर्शना येती !

यमुनेकांठीं गोकुळांतल्या गोपी त्या सगळ्या
खेळायाचें सोडुन येथें आज कशा फिरल्या ?

धांगडधिंगा घालायाची सोडुन मथुरात
मुली मंगळागौरीच्या कां येथें जमल्यात ?

'संक्रांतीचें वाण' घेउनी नाजुक हातांत
नटुनीथटुनी गोंडस बाला आल्या डौलांत ?

चैत्राचें तें 'हळदीकुंकू' किंवा लुटण्याला
'हुजूरपागा' उधळुन आला पोरींचा मेळा ?

तिलोत्तमेच्या स्त्रीराज्याचा शेवट होऊन
उरलीसुरली फौज काय ती आली धांवून ?

मात्र फौज ती बघून कवि हा वेडावुनि गेला
नव्या युगीं त्या गमे जमाना नवा सुरू झाला !

जेथें तेथें तरुण सोबत तरुणी येणार
भिडवुनि खांदा खांद्याला अन् कामें करणार !

कामामध्यें परस्परांचें मन घेइल ओढ
साथासाथिंग जमतिल लग्नें प्रीतीचीं गोड !!

---

## चतुर्थीच्या चंद्रास—

किती वेळ चंद्रा ! घेशी आज उगविण्याला
डोकवून सत्वर दावीं तोंड तें जगाला !

मनीं खास आशा धरुनी गोड त्या फलाची
कडक तें उपोषण करतें सखी ह्या जिवाची
सोडण्यास उपवासाला थांबली कधींची
तिची कींव येई न कैशी तुला रे दयाळा ?

एकलाच जेवुनि आधीं बसें मी घरांत
लक्ष तें न लागे माझें मुळीं वाचनांत
प्रिया अजुन उपवासी ती पाहुनी मुकाट
अंतरांत ममतेचा ये उसळुनी जिव्हाळा !

तिच्यावीण येई न जातां फिरायास दूर
सिनेमास त्यांतहि झाला जावया उशीर !
करूं काय ? झोंप न येई जीव हो अधीर
बिछान्यांत तळमळ लागे भासुनी उन्हाळा !

येइं येइं सत्वर चंद्रा ! दाव रे प्रकाश
तुझ्या दर्शनाविण झाली प्रिया ती निराश
तुझ्यामुळें, तिजवांचुनि मज्जीव हो हताश
भेट झणीं करुनी अमुची पुण्य घे स्वतांला ! !

---

## दोन बायकांचा दादला !

दुर्बुद्धी देवा मज झाली सांग कुठून
स्त्री पहिली तरि दुसरी केली मीं जाणून !

कडकडुनी भांडतात दोघीजणि भारी
लाजुनि त्यां मांजरेंहि पळती पार दुरी !
ती हिजला ही तिजला पाण्यामधिं पाही
पूर्वजन्मि एकमेक वैरी जणुं कांहीं
जर्जर मज दोघींनीं केलें फार छळून
हाडांचा सांगाडा गेला देह बनून !

तुलना ह्या दोघींची करतां मति थकते
एक 'त्राटिका' दुसरी 'गजघंटा' गमते !
काळी ही शूर्पणखा, गौर करंटी ती
दोघींच्या खर्चाला ताळ नसे अगदीं !
चैनीस्तव संपत्ती घेती रोज लुटून
मालक मी असुनी मम देती नच चालून !

श्रीमंती असुनी मज सौख्य न तें कसलें
बुद्धीची भूक कशी शमवावी न कळे !
वारस मज पुत्र नसे दोघींच्या कडुनी
'अगतिक' मी होईं पुरा; सार्थक ना जगुनी !
दोघींचा जिरवाया दत्तक तो देऊन
संन्यासी होउन मी जातों घर सोडून !

---

# त्याचें संततिनियमन !

[धोक्याची सूचना– अविवाहित तरुण-तरुणींनीं ही कविता वाचण्याच्या भानगडींत पडूं नये. !]

कारकून कोणी तयाला पांच मुलें झालीं
छोटें घर त्याचें मंडई तिथें जणूं भरली !

दोन आंकड्यांचा कोठुनी पगार पुरणार ?
महर्गता त्याला तयांतुन करते बेजार !

रात्रंदिन त्यानें खरोखर खरडे घासावे
पोरांबाळांना कसेंतरि पोटाला द्यावें !

दुष्काळांत अशा बायको खर्चिक, रागीट
बहुत मुलांचा त्या तियेला आतां ये वीट !

पतीस ती बोले– "तनू मम ढांसळली पुरती
नको मुलें आतां करा ते 'नियमन' यापुढती !"

'बरें' ! म्हणूनीया तिचा तो विचार त्या पटला
पत्नीचा सल्ला नेमका हृदयाला भिडला !

मात्र वियोगाचा लोटला अल्प न काल कुठें
स्त्री-सहवासाचा तयाच्या जाळ हृदीं पेटे !

पुनश्च कामुकता तयाची जागृत ती झाली
'नियमन-उपकरणीं' अतां पण त्यानें वापरलीं !

जरी 'साधनांनीं' तयानें 'प्रयोग' चालविले
निष्फळ ते ठरुनी ! (व्हायचें नाहीं तें चुकलें !)

'दिवस तिला गेले' ! आणखी वार्ता मग आली—
ह्या वेळीं तिजला अरेरे ! जुळीं मुलें झालीं ! !

---

# कांहीं सोबती

अज्ञात कुणी ती होती नव कवियित्री
आवाज तिचा तो मधुर तयांतुनि भारी
बाहेर गायना जेव्हां म्हणुनी जाई
तो पालक सोबत तिचा अगांतुक येई !

गायिका कुणी ती सुंदर तरुणा होती
देहाची नुकतिच तिच्या उमलली कांती
जलशांत गातसे नृत्य करूनी गोड
लुडबूड कराया बंधु तिचा ये त्यांत !

व्याख्यान ऐकण्या रमणी जाई कोणी
जरि झालें नव्हतें लग्न तियेचें अजुनी
संधान जुळविलें तिनें गुरूशीं अपुल्या
एकटी न सोडी तिज तो कांहीं केल्या !

हपिसांत लागली कोणी नूतन बाला
तिज 'क्लार्क' जवळ जो होता शिकवायाला
मैत्रींत जमवुनी 'प्रेम' तयानें आतां
तिज सोबत करतो घरास जातां येतां !

अभिनेत्री सुंदर सिनेतारका कोणी
बाहेर फिराया जाते नटुनीथटुनी !
नच दिग्दर्शक वा नटही लाभे जेव्हां
तिज सोबत कुत्रा करावया ये तेव्हां !

---

# आंधळा भिकारी

फिरे हा रोज रस्त्याला भिकारी आंधळा प्राणी
मिळाया कांहिं पोटाला किती गर्जे गुरावाणी !

जुनीं फाटून गेलेलीं तयाचीं लक्तरें सारीं
बिचारा भीक हा मागे फिरूनी हाय अनुवाणी !

घरें धुंडाळुनी कोठें शिळी त्या भाकरी लाभे
अरेरे ! भूक हा मारी पिऊनी मात्र तें पाणी !

कडाखा तीक्ष्ण थंडीचा पडूनी आज एकाकीं
मरूनी बापुडा जाई ! तडाखा दैव कां हाणी ?

भुकेची हांक ती आतां कधीं ना यायची कानीं
दयेची भीक घालाया न यावें यापुढें कोणी !

पडे बाजूस रस्त्याच्या कधींचें प्रेत हें त्याचें—
जरी बेवारशी ! त्याची तरी ना व्यर्थ जिनूगाणीं !

दवाखान्यामधें जातां तयाचें प्रेत फाडाया
मुलांना 'ज्ञान' तो देई स्वतःच्या खास हाडांनीं ! !

## मातृविलाप

मज सांग सांग बाळा ! आहेस तूंच कोठें
तुझ्याविना जिवाला जग शून्य शून्य वाटे !
डोळ्यांसमोर माझ्या ये धांवुनी झणीं तूं
दुःखी सुखी कसाही मानूं नकोस किंतू !
चुकुनी तुझ्या जिवाला झालें अनिष्ट कांहीं
'मृत तूं हयात किंवा' कैसें कळे न बाई !
जरि सोडुनी मला तूं देवाघरास जाशी
असशी तिथें सुखानें सोशीन दुःखराशी !
तुझा परी अभाव दिनरात्र टोचुनीया
दुःखार्णवांत पाडी माझ्या जिवास वायां !

वाऱ्यावरी विरूनी गेलींत सात वर्षें
वार्ता जिवा-फुलाची कानीं कशी न गर्जे ?
'आईस भेटण्याला तो आज ना उद्याही
येईल खास ऐशी' आशा मनांत वाही !
आशा अशी मनाची जातांच काल कांहीं
हा ! हाय ! हाय ! कैशी जाते मरून बाई ?
एका क्षणांत आशा दुसऱ्या क्षणीं निराशा
ऐशी स्थिती मनाची देवा ! कुठें कुणाची ?

तारुण्य बालकाच्या वदनावरून खेळे
मूर्ती बघावयासी कां धांवतात डोळे ?
नशिबीं कुळांत मोठ्या ज्याचाच जन्म होई
तेथें कमी कशाचें ? सौख्यांत जीव राही !

मी जन्म दे तयाला विश्वीं विहारण्यातें
अज्ञान बाळ माझा सज्ञान, शूर वाटे !
लडिवाळ लाडक्यानें केले गुन्हे कितीही
त्यानें जिवास माझ्या लागे न डाग कांहीं !

ते खेळ खेळतांना स्वर्गीय मोद ज्याला
चुकुनी मधें परंतू येई रडूं तयाला !
कानांवरून येतां स्वर मात्र रोदनाचे
मज्जीव घाबरूनी जळ होइ अंतराचें !
माझ्या अशी मनाची जाणीव काय त्यास ?
दुःखी सुखी कशी मी त्याची तया न कांस !
वर्षानुवर्ष जातां जरि बाळ वाढलाही
मत्प्रेम त्यावरीचें होतें कमी न कांहीं !

तूं सोडशी मला कां ? (छे ! कल्पना नको ही)
कां कल्पना परी ती चुकुनी मनांत वाही !
आत्मप्रभाव माझा वेळेस ह्या अशा कीं
तव दोष ना स्मराया हृदयांत दुःख झांकी !
बाळा ! दयाळ आई तव ही तुझ्याच पायीं
खस्ता कितीक खाई त्याचें तुला न कांहीं !
बाळा ! तुझ्याचसाठीं गळतात अश्रुधारा
रात्रंदिनीं कुणाला ह्याचा जरी न वारा !

हे राजसा ! जरी तूं झालास हीन, दीन
चिंता न तूं करावी धन, कीर्त लाभली न !
परि धांव धांव आतां आईस भेट द्याया
बघ दार मोकळें हें आतूर तूज घ्याया !

मी दुःखसागरीं ह्या फसली गरीब धेनू
येतां न तूं जिवाला आधार काय मानूं ?
साऱ्या सुखोपभोगां हा जीव त्रासुनीया
वाटे तुझ्याविना कां 'सब् झूट है दुनीया' !

स्वच्छंद संचराया तारांगणांत भव्य
विहगांस देव देई कां पंख फक्त दिव्य ?
वायूसवें रमूनी गाऊन गोड गाणें
निमिषांत भेटताती पक्षी पिलां सुखानें !
परि मानवी जिवांना स्वजनांस भेटण्याला
सुखलाभ तो न; कां ही देवा ! तुझीच लीला !
देवा ! तुझीच लीला नाहीं इलाज कोणा
खिळलों धरेस म्हणुनी झाणिं गांठ आमुची ना !

कां ग्रासितां ठकांनीं तूं बंधनालयांत ?
वा भक्ष्य घावलासी पशुंना कुठें वनांत ?
ओसाडशाच जागीं किंवा तुला कुणीं का
फेकीयलें म्हणूनी तूं गव्हरीं दडे कां ?
किंवा प्रवासतांना दर्यांत त्या तुफान
तारूं फुटून तूं कां मित्रासवें कुठें न !
मित्रासवें कुठें रे तूं सांग सांग बाळा !
कां काळझोंप घेशी ? तें ना कळे जिवाला !

मी वांछितें भुतांना बघण्यास रोज रोज
मृत बाळ तो तरीही देईल भेट खास !
परि ह्या हताश जीवा कुणि भेटतें न कैसें ?
असती जगीं भुतें कां ? कोडें मलाच माझें !

'पृथ्वींत लोक जे नी स्वर्गांत लोपले ते
(कोणी असें वदे कीं,) यांच्यांत भेट होते !
उक्तींत सत्य ऐशा मग अल्पशा दिनांनीं
दृष्टीस बाळ माझा येणार तो दिसूनी !

काहूर कल्पनांचें डोक्यांत संचरून
जीवास वेड लावी कां वंचना करून !
करितात वृक्षपानें जरि हालचाल कांहीं
तरि नाद तो तयांचा जीवा चुकून दाही !
जमिनीवरून छाया गगनाचिया घनांनीं
फेंकीयली तरी कां मन जाइ बावरूनी !
वस्तू निसर्गतेच्या मी घे तयां पुसूनी—
'मम बाळ पाहिला का ? सांगे परी न कोणी !
ती स्तब्धता तयांची माझ्या वियोगदहनीं
भडकून हेंच वाटे— 'जग कां भरे खलांनीं ?'

बाहेर कल्पनेच्या हा शोकवह्नि माझा
विझवावया तयासी नाहीं झरा सुखाचा !
पाहून दुःख येई माया कुणास माझी
माया परी न कोणा माझ्याच लाडक्याची !
माझ्याविना न कोणा माया तुझीच बाळा
तुजला कळे न कैसें ? जगिं ना कुणी कुणाला !
यतां कठीण काळ कामास कोण येई
दुःखांत सांपडें मी ती धांव कोण घेई ?
बाळा ! विलापज्वाला भडकूनिया अशा रे
बघ जाळिती जिवाला झणिं धांव तूंच ना रे !

तूझ्याविना जिवाला नाहीं जगांत कोणी
ये, सांग वृत्त किंवा 'सुखरूप तूं म्हणूनी ! !'

( आंग्लकवि वर्ड्स्वर्थ याच्या The Affliction of Margaret या इंग्रजी कवितेचा अनुवाद. हीच माझी पहिली कविता होय !)

---

## तो आणि ती

तो म्हणाला मी असें तो 'क्लार्क' खंदा लेखक
ती म्हणाली मीहि आहें 'टायपिस्ट्' अन् वाचक !

तो म्हणाला वाचशी का गोष्टि माझ्या मासिकीं ?
ती म्हणाली सर्व गोष्टी चोरट्या त्या ठाउकी !

तो म्हणाला काढितों मी छान फोटो ते किती
ती म्हणाली 'स्नॅप' माझा तूं नको घेऊं कधीं !

तो म्हणाला ब्रह्मचारी देह मीं हा राखिला
ती म्हणाली चोरुनी तूं पाहसी वेड्या ! मला !

तो म्हणाला वेड लावी रूप तूझें गोजिरें
ती म्हणाली जाणतें मी तूं कसा असशी बरें !

तो म्हणाला प्रेम माझें मी तुला अर्पूं कसें ?
ती म्हणाली तेवढें तूं सोडुनी द्यावें पिसें !

तो म्हणाला का जिव्हारीं बाण ऐसा मारिशी ?
ती म्हणाली प्रेमप्राप्तीं झुंज चाले ही अशी ! !

---

# नाल

हा नाल कैसा दिसण्यांत झोंक
कीं वांकडा आणिक त्या न टोंक !
च्छिद्रें तयाचीं जर कोण लक्षी
वाटेल त्याला जणुं रम्य नक्षी !

ते बैल, घोडे चतुष्पाद प्राणी
ह्या मान देतात मोठ्या ठिकाणीं !
वाटे जणूं कीं हा 'चांद' त्यांचा
ताईत पायांतला एक साचा !

जोडे नरांचे जसे पादत्राण
हे नाल त्यांचे तसे पाद-त्राण !
ह्यांच्याविना ते रडतील धाय
उन्हामधूनी पळतांच हाय !

बाळंत गेली कुठें कोण बाई
उंबऱ्यावरी हा गृहीं त्या शिपाई !
स्मृती तिची ती सफलां कराया
हा जन्म घेई खरा 'बाल-राया' !

उंबऱ्यावरी हा कुठें देवळांच्या
दृष्टोत्पतीला पडे भाविकांच्या !
अचूक तेव्हां मनीं हेंच येई—
'हा लाभ ह्याला कसा प्राप्त होई' ?

*　　*　　*

जोड्या-बुटांना तसें वाहणांना
नाला ! तुला लाविती लोक नाना !
परोपकारार्थ सदा झटून
जाशी लया तूं झिजुनी झिजून !

मोठ्या कुळीं ना तुझा जन्म नाला !
तरी धन्य वाटे तूं मन्मनाला !
तूं क्षुद्र वस्तू जरि कोपऱ्यांत
होतो तुझा फायदा हर्तऱ्हेंत !

भासे परी दोष तुझ्यांत नामी
तूं फार आहेस परावलंबी !
'चुके'† विना तूं असुनी जगास
मेल्याप्रमाणें दिसणार खास !

येऊन आतां पण ही लढाई
लोखंड सारेंच महाग होई !
मार्गीं तुझा लाभ जरी घडेल
पैसाच पैसा मज तो मिळेल ! !

[ † ह्या चुकेचा अर्थ श्री. ह. स. गोखले यांची 'चूक' ही कविता असा केल्यास ती एक चूकच होणार आहे !]

---

## गोड गुपित*

(श्रीमंत स. र. पंतसचिव यांची 'रति' ही सुंदर कविता ज्यांनीं वाचली असेल त्यांना ह्या कवितेंतील रहस्य (!) अधिक कळून येईल.)

सोड तुझा हेका
आतां, लाविशि कां चटका ?

नकळत पहिल्या भेटीसरशीं
भुरळ मनाला पाडुनि खाशी
भ्रमरासम कां निघुनी जाशी
झुलवुनि ही कलिका!
आतां, लाविशि कां चटका ?

नांव, कीर्त तव ऐकत होतें
स्वरूप देखुनि भाळुनि जातें
त्वत्प्रीतीची कांस धरीतें
रात्रंदिन घटका
आतां, लाविशि कां चटका ?

प्रेमळ अस्फुटता वदण्याची
झडती चकमक ती डोळ्यांची
दिसुनी आज न येते कैशी ?
पांघरुनी बुरखा
आतां, लाविशि कां चटका ?

'सौख्य जिवाला हवें म्हणूनीं
दाविलेंस हृदया उकलूनी'
प्रेम खरें तव घ्याया कळुनी—
आलें तव मुलुखा
आतां, लाविशि कां चटका ?

फिरूनिया तव जाई बुद्धी
माझी नुरली तुजला शुद्धी
परंतु मी तव झालें बंदी
सुटत न हा विळखा
आतां, लाविशि कां चटका ?

लटका होउनि तूं गारूडी
माझ्याशीं कां करशि लबाडी ?
प्रीतीनें तव झालें वेडी
तरुला जणुं लतिका
आतां, लाविशि कां चटका ?

हुरळुनि अगदीं मी बघ गेलें
मन हें माझें तुजवर जडलें
मदनानें शरिरास पीडिलें
शांतविं हा कडका
आतां, लाविशि कां चटका ?

गळ्यांत माझ्या कर घालुनिया
कवटाळाशि मज कां नच राया ?
अंत किती बघसी शिणवाया ?
सत्वर घेइं मुका
आतां, लाविशि कां चटका ?

बघशी मजला कां गुरगुरुनी ?
पुसशी भाषण कांहिं न करुनी
गेलें मी बघ पार गळूनी
सोसुं किती सणका
आतां, लाविशि कां चटका ?

जिवास भोळ्या खेळविणारा
सलगी माझ्याशीं करणारा
कायम मज कां देशि न थारा– ?
फुगवुनि प्रेमफुगा
आतां, लाविशि कां चटका ?

लग्न करूनी तूं माझ्याशीं
साक्ष पटूं दे सहवासाची
सांगत तोंवर नाहिं कुणासी–
'मी मनि, तूं बोका'
आतां, लाविशि कां चटका ?

[* सहवासोत्तर विवाहाचें हें 'गोड गुपित' सनातन्यांना आणि संस्कृतिसंरक्षकांना न कळण्यांतच खरी मौज नाहीं का ?]

---

## मी सिनेटोन काढीन !
## जगवीन ! !
## आणि बुडवीन ! ! !

कर्ज घेऊन मी सिनेटोन काढीन !

हिंमत धरुनी मनांत भारी
माजुन गेली जी बेकारी
नाश करिन ती ह्या व्यवहारीं
लोक जमवून मी सिनेटोन काढीन !

जाहिरात ती पत्रीं देइन
सकल जीव हा कलेस वाहिन
कलावंत ते संनिध आणिन
जूट बनवून मी सिनेटोन काढीन !

लेखकांस मी देइन मान
गोष्टी त्यांच्या घेइन छान
दैन्य तयांचें खास हरीन
स्नेह जोडून    मी सिनेटोन काढीन !

गोव्याला मी संतत जाइन
निसर्गशोभा अवलोकीन
सुंदर तेथिल स्त्रिया कुलीन
अहा मिळवून    मी सिनेटोन काढीन !

नटांस मोठा पगार देइन
स्वतांस मोटर नवीन आणिन
नटींस घेउनि रोज फिरेन—
मौज मारून    मी सिनेटोन काढीन !

हवी तशी मी चैन करीन
नाचरंगिं तें धन उधळीन
दारु, रेसचें व्यसन धरीन
धुंद होऊन    मी सिनेटोन काढीन !

करुनि जाहिरातींचा भपका
नवीन 'चित्रें' दाविन लोकां
'पडतां' तीं पण कोठुनि पैका ?
खर्च सोसून    मी सिनेटोन जगवीन !!

डोक्यावरुनी जातां कर्ज
नादारीचा देईन अर्ज
होती नव्हती सोडुनि लाज
स्वतः होऊन    मी सिनेटोन बुडवीन !!!

---

## हिमालयाच्या पायथ्याशीं—

नयनमनोहर निसर्गशोभा कधिं न अशी पाहिली
प्रफुल्लित वृत्ती मम जाहली !

हिंडत आलों हिमालयाच्या पायथ्यास मी कुठें—
सकाळीं जों न तांबडें फुटे !
चहुंकडेच पर्वत अफाट विस्तारले
ते सर्व हिमानें आच्छादुनि टाकले
जणुं भस्म चर्चुनी तपास ऋषि बैसले
निसर्ग देई प्राजक्ताचे धवल सडे घालुनी
दुधाचे सागर वा थाटुनी ?

इतस्ततः ते तऱ्हेतऱ्हेचे वृक्ष किती बहरले
फुलां-फळभारांनीं वाकले !
वसंत येउनि सृष्टिसुंदरी भासुनि दिव्याप्सरा
नेसली शालू हिरवा खरा !
हिमनगातुनी ये पवित्र गंगानदी
नागीण रुपेरी धांवे वेगामधीं
ध्वनि तिचा निनादे प्रशान्त जागीं किती
दरींदरींतुन घुमवित आली मंगलमय गर्जना
खरोखर तेजस्वी अंगना !

उदयगिरीवर बालरवीचें दिव्य तेज बिलसुनी
राहिले चहूंकडे फांकुनी !

उषादेविनें गगनश्रीला तिलक जणूं लाविला
सूर्य तो तेजोमय भासला !
बालार्क किरण ते नभांतुनी धांवले
जललहरीवरती हळू हळू पातले
अन् नृत्य कराया स्वच्छन्दें लागले
सुवर्णरसमय रंग उधळते रंगदेवता कुणी–
नदीच्या जलांत अवतारुनी !

शुभ्रस्फटिकासमान निर्मल गंगाजल भासतें
नेहमीं अथांग तें वाहतें !
तऱ्हेतऱ्हेचे सुंदर मासे तिच्यामधें तळपती
तयांच्या वर्णूं जाती किती ?
गंगेस पूर ये ऐन उन्हाळ्यामधें
वितळल्या हिमाचें जल सगळें वाहतें
अंगास अती तें गार गार लागतें
उसळुनि लाटा खडकांवरती फुटती फेसाळुनी
चूर हो चांदीचा त्या क्षणीं !

हिमालयाच्या पायथ्यास ह्या गंगातीरावर
गांव हें 'हृषीकेष' सुंदर !
चढण-उतारावरचा रस्ता झाडींझाडींतुन
मोकळी थंड हवा त्यांतुन !
फिरतात विहंगम इकडुन तिकडे किती
आलाप गोड ते गाण्याचे काढती
रंगून तयांच्या गानीं जाते मती
'प्रवास सगळा सुखकर होवो'– देति मला सांगुनी–
दूत हे देवाचे भेटुनी !

पूल इथें हा 'लछमन्-झूला' गंगेवर पाहुनी
कथा ये पुराणांतली मनीं !
उभे राहुनी तप आचरिलें लछमनूजीनें जिथें
स्थलीं त्या देवालय शोभतें !
किति साधुसंत ह्या स्थलीं अहा पातले
तप खडतर त्यांनीं इथेंच आरंभलें
मोक्षास सर्व ते जाउनिया पोचले
'काली कमळीबुवा' तयांचा 'स्वर्गाश्रम' पाहुनी–
इथें तर गेलें मन रंगुनी !

चमत्कृतीची वनराजी ती जिथें तिथें ह्या स्थलीं
जणूं ये नंदनवन भूतलीं !
स्वर्गधरेचा सुरेख संगम इथेंच मज भासतो
येथुनी देवहि ना दूर तो !
ह्या पवित्र जागीं पर्णकुटी बांधुनी
वाटतें रहावें प्रियसखिला घेउनी
तिजसवें करावा विहार रानींवनीं
तप नाहीं पण करीन कविता, जीव इथें लोभला
स्फूर्तिचा सागर ओथंबला !

हृषीकेष– 'लछमन्-झूला'
ता. १५-६-४४.

---

## अभागिनीचे अश्रू

बोल न रे बाळा स्नेहाळा मन्मन शान्तविण्याला
दैवें ह्या घटिला कोसळला मजवर दारुण घाला !

पातिव्रत्याचा प्रेमाचा पंचीप्यारा साचा
ह्या बघ जीवाचा झुलण्याचा झुलता झोला गेला !

लग्नानंतरचे दिन कैसे माझ्या सौभाग्याचे
गेले गमतीचे सौख्याचे सोडुनि कैसे मजला ?

वैभव तें सगळें ओसरलें नशिबीं कांहीं नुरलें
कपाळ हें असलें मम फुटलें काय करूं मी त्याला ?

दुर्दैवी जगणें आक्रमणें मजसी लाजिरवाणें
हें मम रडगाणें दुःखानें गाउं किती मी तुजला ?

जगणें जगतीं ह्या हे सखया काळजी तुझी रे घ्याया
मजवांचुनि माया तव राया येइल का कोणाला ?

बाळा ते खेळ तूं खेळ बोबडेच बोलुनि बोल
ते मज बहुमोल गमतील दुःखा तारायाला !

सत्वर तूं आतां हो मोठा सुंदर नी कुलवंता
मग ही तव माता धन्य स्वतः जगुनी कर्तव्याला !!

---

## घेतली कशीतरी स्वाक्षरी !

अचाट यत्नान्तरीं घेतली कशीतरी स्वाक्षरी !
स्त्रीपुरुषांचा अफाट मेळा
जमला होता आज सभेला
सुंदर वक्ता त्यांत लाभला
संधी येउनि खरी घेतली कशीतरी स्वाक्षरी !

सभा शेवटीं जों न संपली
फलाटवरती पोरें जमलीं
स्फूर्ति मला येउन त्या वेळीं
घुसुनि अघाडीवरी घेतली कशीतरी स्वाक्षरी !

गर्दीमधुनी पुढती घुसतां
धक्काबुक्की करतां करतां
घामाघुम जिव झाला नुसता
सोसुन हें संगरीं घेतली कशीतरी स्वाक्षरी !

धांदल माझी कोण उडाली
गर्दीमध्यें टोपी गेली
वहाण पायांमधली तुटली
हानी झाली तरी घेतली कशीतरी स्वाक्षरी !

चष्मा डोळ्यांवरचा फुटला
कोट-खिसा कुणीं कापुनि नेला
चित्त न ठायीं त्या वेळेला
शिस्त मोडुनी बरी घेतली कशीतरी स्वाक्षरी !

स्वयंसेवकांनीं मज धरलें
वक्त्यापासुन दूर लोटलें
ब्रीदाचें नच तारूं झुकलें–
उलटा वारा जरी घेतली कशीतरी स्वाक्षरी !

दुःख संपतां काल सुखाचा
कष्टानंतर लाभ 'सही'चा
अखेर मजला हो कायमचा
खात्री पटुनी पुरी घेतली कशीतरी स्वाक्षरी !

---

## निर्धार !

शरिरांत प्राण ह्या जोंवरती
हें निशाण राहिल मम हातीं !

युद्ध पेटतां स्वातंत्र्याचें
पाश तोडुनी घरदाराचे
व्रत आचरिलें सत्याग्रहिचें
मानुनि मरणाची न क्षिती !

राष्ट्रिय मैदानावर आज
झेंडावंदन करावयास
जमला मोठा लोकसमाज
मी सेवक त्यांतुनि क्षुद्र किती !

झेंडावंदन सुरू जहालें
राष्ट्रगीत दुमदुमुनी गेलें
ऐकुनि पण नृपदूत धांवले
हटविण्यास जमलेली गर्दी !

त्यांतुनि त्यांच्या लाठीमारें
दुखावले किति प्राण बिचारे
निंद्य तयांचे प्रकार सारे
मी सांगुं कसें तें ?— त्या न मिती !

दंगलींतुनी त्या समयासी
निशाण राष्ट्रिय रक्षायासी
धांवत गेलों मी त्यांपाशीं
तों ओढवली मम दैवगती !

निशाण हातीं जों न घेतलें
नृपदूतांनीं मला घेरिलें
मरेमरेतों आणि मारिलें
निक्षून वदें पण मी अगदीं—

'शरिरांत प्राण ह्या जोंवरती
हें निशाण राहिल मम हातीं !'

वंदे मातरम्

# वारुळांतील मुंग्या


| कविता | वृत्त, जाति, चाल | प्रसिद्धिस्थल | पृष्ठ |
|---|---|---|---|
| टेरेन्स् मॅक्स्विनी ... | सुमंदारमाला ... | झारापकर ... | १ |
| त्याची भूक ... | मंजरी ... | सवाईजीवन ... | २ |
| बाथरूम-सिंगर ... | गज्ल ... | तारका ... | ३ |
| माहेरीं गेलीस पण ... | पृथ्वी ... | मन्वन्तर (दि.अंक) | ४ |
| 'लाल' बावटेवाले ... | चंद्रकांत ... | विविधवृत्त ... | ५ |
| केळीचें झाड आणि मी | दिंडी ... | वसंत, महाद्वार... | ६ |
| तिचा मंगळ ... | मंजरी ... | प्रतोद ... | ७ |
| भविष्य माझें सांगायाला | केशवकरणी ... | महाद्वार ... | ८ |
| क्लबाकडील गोष्टी ... | वसंततिलका ... | तारका (दि. अंक) | ९ |
| दत्तक ...... | मंजरी ... | प्रतोद ... | १२ |
| पुराणिकबुवा ... | सूर्यकांत ... | झारापकर, भगिनी | १३ |
| सैंपाकीण नव्हे मालकीण | साकी ... | प्रतोद | १४ |
| नटीच्या नवऱ्याचें गाऱ्हाणें | चंद्रकांत ... | तारका | १५ |
| हाय ! हाय ! तो भाला | चंद्रकांत ... | प्रतोद ... | १७ |
| माझें नाटक ... | प्रणयप्रभा ... | झारापकर, तारका | २० |
| दोन बायकांचा खासगी संवाद ... | मंजरी ... | प्रतोद ... | २१ |
| लोकप्रिय अण्णा गेले ! | उद्धव ... | मन्वन्तर ... | २२ |
| बारी ... | बालानंद ... | मन्वन्तर ... | २४ |
| फराळाचा डबा ... | मोहिनी ... | विविधवृत्त ... | २७ |
| नापिकदादा ... | केशवकरणी ... | काळ ... | २८ |
| माहेरीं न्या ! ... | भूपति ... | भगिनी (दि. अंक) | ३० |
| बकुलवृक्षास ... | शार्दूलविक्रीडित ... | ज्ञानप्रकाश ... | ३२ |
| भगवान् गौतम बुद्ध ... | साकी ... | प्रतोद ... | ३३ |
| बर्नेट् मारकस् ... | कोकिळा ... | प्रतोद, मन्वन्तर (दिवाळी अंक)... | ३८ |

| कविता | वृत्त, जाति, चाल | प्रसिद्धिस्थल | पृष्ठ |
|---|---|---|---|
| एक मागणें ... | चंद्रकला ... | प्रतोद ... | ३९ |
| मित्राच्या शेतवाडीवर | केशवकरणी ... | प्रतोद ... | ४० |
| नटीचें रडगाणें ... | अयनी ... | तारका ... | ४३ |
| तो कारकून आणि लेखक | दिंडी ... | काळ ... | ४४ |
| मी आणि मामा ... | गज्जल ... | तारका ... | ४६ |
| फोटोग्राफर तो ... | शार्दूलविक्रीडित ... | तारका ... | ४७ |
| खोली मिळेल तर शपथ | गज्जल ... | प्रतोद ... | ४८ |
| तंट्या भिल्ल ... | चंद्रकांत ... | काळ ... | ४९ |
| चटकचांदणी ... | चंद्रकला ... | चंद्रिका, प्रतोद | ५१ |
| अश्लीलमार्तंड ... | दिंडी ... | प्रतोद (दि.अंक) | ५२ |
| हरिद्वार ... | चंद्रकांत ... | प्रतोद ... | ५४ |
| लगिनघाई ... | दिंडी ... | तारका ... | ५७ |
| तरुणींचा ताफा ... | चंद्रकांत ... | विविधवृत्त(दि.अं.) | ५८ |
| चतुर्थीच्या चंद्रास ... | मोहिनी ... | प्रतोद ... | ६० |
| दोन बायकांचा दादला | शुभवदना ... | तारका ... | ६१ |
| त्याचें संततिनियमन | चंद्रकला ... | तारका (दि.अंक) | ६२ |
| कांहीं सोबती ... | भूपतिवैभव ... | तारका ... | ६३ |
| आंधळा भिकारी ... | गज्जल ... | विविधवृत्त ... | ६४ |
| मातृविलाप ... | रसना ... | प्रतोद ... | ६५ |
| तो आणि ती ... | गज्जल ... | तारका ... | ६९ |
| नाल ... | उपजाति ... | विविधवृत्त ... | ७० |
| गोड गुपित ... | रति ... | वसुंधरा ... | ७२ |
| मी सिनेटोन काढीन... | फुलवेल ... | तारका ... | ७४ |
| हिमालयाच्या पायथ्याशीं | केशवकरणी ... | प्रतोद ... | ७६ |
| अभागिनीचे अश्रू ... | घुंघुरवाळा ... | काव्यरत्नावली | ७९ |
| घेतली कशीतरी स्वाक्षरी | मनी ... | तारका ... | ८० |
| निर्धार ... | प्रणयप्रभा ... | झारापकर ... | ८१ |